प्रकरण पाचवे

# माहितीचे पृथक्करण व अर्थनिर्वचन

**प्रकरण - पाचवे**

# माहितीचे पृथक्करण व अर्थनिर्वचन

५.१. प्रास्ताविक

विभाग " अ "

५.२. शिक्षकांच्या वैयक्तिक माहितीचे पृथ:करण व अर्थनिर्वचन

५.३. क्षमताधिष्ठित शिक्षणाच्या मूल्यमापनाबाबतचे पृथक्करण व अर्थनिर्वचन

विभाग " ब "

५.४. मुख्याध्यापकांच्या वैयक्तिकमाहितीचे पृथक्करण व अर्थनिर्वचन

५.५. क्षमताधिष्ठित शिक्षणाच्या मूल्यमापनाबाबतचे पृथक्करण व अर्थनिर्वचन

विभाग " क "

५.६. अधिकाऱ्याच्या वैयक्तिक माहितीचे पृथक्करण व अर्थनिर्वचन

५.७. क्षमताधिष्ठित शिक्षणाच्या मूल्यमापनाबाबत मुलाखतीतून मिळालेल्या माहितीचे अर्थनिर्वचन

५.८. प्राथमिक शाळांना दिलेल्या भेटी व निरीक्षणातून मिळालेल्या माहितीचे अर्थनिर्वचन

**प्रकरण पाचवे**

# माहितीचे पृथक्करण व अर्थनिर्वचन

शिक्षक प्रश्नावली, मुख्याध्यापक प्रश्नावली, गटशिक्षणाधिकारी, भागशिक्षणविस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख मुलाखती , शाळांना भेटी व निरीक्षणे

## ५.१. प्रास्ताविक:-

पहिल्या चार प्रकरणामध्ये संशोधकाने क्षमताधिष्ठित शिक्षणाबाबत तात्वीक भागाचा विचार केला आहे. प्रकरण चौथ्याचा उपयोग या संशोधनाची पार्श्वभूमी तयार करण्यासाठी असून मिळालेल्या माहितीचे पृथक्करण व अर्थनिर्वचन करणे हे प्रस्तुत प्रकरणाचे उदिष्ट आहे.

प्राथमिक शिक्षणात प्राथमिक शिक्षकास क्षमताधिष्ठित शिक्षणात, मूल्यमापनात येणाऱ्या समस्याबाबत प्राथमिक शिक्षक हा महत्त्वाचा असल्यामुळे त्यांची निवड संशोधनासाठी केली. त्याच्यासाठी शिक्षक प्रश्नावली तयार केली, त्या प्रश्नावलीचा नमुना परिशिष्ट " अ " मध्ये शिक्षक मुलाखत प्रश्नावली, परिशिष्ट " ब " मध्ये शिक्षकाची यादी, " क " मध्ये मुख्याध्यापक मुलाखत प्रश्नावली " ड " मध्ये मुख्याध्यापकांची यादी " इ " मध्ये अधिकाऱ्यांची मुलाखत प्रश्नसूची " ई" अधिकाऱ्यांची यादी आणि परिशिष्ट " फ " मध्ये केंद्रप्रमुखाची यादी देण्यात आली आहे.

### विभाग - " अ "

## ५.२. शिक्षकांच्या वैयक्तिक माहितीचे पृथक्करण व अर्थनिर्वचन : -

विभाग " अ " मध्ये शिक्षकांनी प्रश्नावलीद्वारे दिलेल्या माहितीचे पृथक्क रण व अर्थनिवर्चन केले आहे.


शिक्षक प्रश्नावलीत पहिल्या " अ " विभागात शिक्षकांच्या वैयक्तिक माहितीच्या संदर्भात प्रश्न विचारले होते. ( प्रश्न क्रमांक १ ) संपूर्ण नाव, ( प्रश्न क्रमांक २ ) पुरुष / स्त्री, ( प्रश्न क्रमांक ३ ) वय, ( प्रश्न क्रमांक ४ ) शाळेचे नाव, केंद्र व पत्ता, ( प्रश्न क्रमांक ५ ) शैक्षणिक पात्रता, ( प्रश्न क्रमांक ६ ) व्यावसायिक पात्रता, ( प्रश्न क्रमांक ७ ) क्षमताधिष्ठित इयत्ता शिकविलेली वर्षे, प्रश्नावलीतील या प्रश्नांच्या आधारे प्राप्त माहिती या ठिकाणी दिलेली असून शिक्षकांची यादी परिशिष्ट " ब " मध्ये दिली आहे.

जिल्हा परिषदेच्या ५० शाळांतील शिक्षकांचा प्रतिसाद मिळाला असून कोष्टक क्रमांक ५.०१ मध्ये ( प्रश्न क्रमांक ५ व ६ नुसार ) शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता दाखविलेली आहे.

कोष्टकांशी सुसंगती साधण्यासाठी आलेख संबंधित
कोष्टकांच्या डाव्या बाजूस लावला आहे.

## आलेख क्रमांक - ५.०१

## शिक्षकांची शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता



## कोष्टक क्रमांक - ५.०१

## शिक्षकांची शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता

| अ. क्र. | शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता | प्रतिसादक शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | एस्. एस्. सी., डी. एड्. | २४ | ४८ ०० % |
| २. | एच. एस्. सी., डी. एड्. | ०२ | ०४ .००% |
| ३. | पदवीधर - बी. ए., डी. एड्. | १३ | २६.००% |
| ४. | पदवीधर - बी. ए., बी. एड्., बी. पी. एड्. | ०४ | ०८. ००% |
| ५. | पदव्युत्तर - एम्. ए., बी. एड्. | ०४ | ०८. ००% |
| ६. | पदव्युत्तर - एम्. ए., डी. एड्. | ०१ | ०२.००% |
| ७. | पदव्युत्तर - एम्. ए., एम्. एड्. | ०२ | ०४.००% |
| ८. | ज्युनि. पी. टी. सी. | ०० | ०% |
| ९. | सिनि. पी. टी. सी. | ०० | ०% |
| | एकूण | ५० | १००% |

कोष्टक क्रमांक ५.०१ वरुन असे निदर्शनास दिसून येते की, पदवीपेक्षा कमी पात्रता असणाऱ्या शिक्षकांची जिल्हा परिषदेमध्ये संख्या २६ आहे. ( त्यामध्ये एस्. एस्. सी. डी. एड्. शिक्षक संख्या = २४, एच्. एस्. सी. , डी. एड्. शिक्षक संख्या = ०२ आणि ज्युनिअर पी. टी. सी. व सिनिअर पी. टी. सी. शिक्षक संख्या अनुक्रमे = ०० ) आहे. पदवीपेक्षा कमी पात्रता असणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण ५२.००% आहे. ही बाब समाधानकारक नाही. शिक्षकांची शैक्षणिक पात्रता कमी दिसून येते.

पदवीधर बी. ए., डी. एड्. = १३ व पदवीधर बी. ए. , बी. एड्., बी. पी. एड्. = ०४, पदव्युत्तर - एम्. ए., बी. एड्. = ०४, पदव्युत्तर एम्. ए., एम्. एड्. = ०२, पदव्युत्तर एम्. ए., डी. एड्. = ०१ झालेले शिक्षक ४८.०० % आहेत. तरी शिक्षकांनी त्यांची शैक्षणिक पात्रता वाढवणे गरजेचे आहे.

### ५.३. क्षमताधिष्ठित शिक्षणाच्या मूल्यमापना बाबतचे पृथक्करण व अर्थनिवर्चन:-


शिक्षक प्रश्नावलीत " ब " भागात क्षमताधिष्ठित शिक्षणाच्या मूल्यमापनाबाबत प्रश्न विचारले होते.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक ८ मध्ये नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आपणास योग्य वाटते का ? याबाबत शिक्षकांनी दिलेला प्रतिसाद पुढील कोष्टक क्रमांक - ५.०२ मध्ये दाखविलेला आहे.

कोष्टकांशी सुसंगती साधण्यासाठी आलेख संबंधित
कोष्टकांच्या डाव्या बाजूस लावला आहे.

## आलेख क्रमांक - ५.०२

## शिक्षकांचा क्षमताधिष्ठित अभ्यास विषयातील अध्यापन अनुभव



## कोष्टक क्रमांक - ५.०२

## नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाबाबत शिक्षकांचे मत

| अ. क्र. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय. | ५० | १००% |
| २. | नाही. | ०० | ०% |

कोष्टक क्रमांक - ५.०२ मध्ये असे दिसून येते की, १००% शिक्षकांच्या मते नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण योग्य वाटते, ही बाब योग्य वाटते.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक ९ मध्ये शिक्षकांना इयत्ता ३ री व ४ थी विषयातील अध्यापन अनुभव आहे का ? असल्यास किती वर्षाचा ? असा प्रश्न विचारला होता. याबाबत कोष्टक - ५.०३ मध्ये शिक्षकांची अध्यापन अनुभवाची सरासरी दाखविलेली आहे.

## कोष्टक क्रमांक - ५.०३

## शिक्षकांच्या एकूण विषयातील अध्यापन अनुभवाची सरासरी

| अ. क्र. | अनुभवाचे वर्गांतर | प्रतिसादक शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | ० ते ५ | १४ | २८.००% |
| २. | ६ ते १० | २० | ४०.००% |
| ३. | १० च्या पुढे | १६ | ३२.००% |
| | एकूण | ५० | १००% |

कोष्टक क्रमांक - ५.०३ वरुन जिल्हा परिषद शिक्षकांच्या अध्यापन अनुभवाची सरासरी पुढील प्रमाणे -

मध्यमान = $M = A.M. + C \times I$

$= ८ + (-०.०४) \times ५$

$= ८ - ०.२$

$= ७.८$

यावरुन असे दिसून येते की, जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांच्या अध्यापन अनुभव जास्त असल्यामुळे क्षमताधिष्ठित शिक्षणावर त्याचा योग्य परिणाम होतो.

शिक्षक प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक ११ मध्ये गेल्या दहा वर्षात आपण पुढीलपैकी कोणते प्रशिक्षण पूर्ण केले आहे ? असा प्रश्न विचारला होता. याबाबत पुढील कोष्टक क्रमांक - ५.०४ मध्ये शिक्षकांनी दिलेला प्रतिसाद दाखविलेला आहे.

## कोष्टक क्रमांक - ५.०४

## शिक्षक संख्या व किमान अध्ययन क्षमता कोर्स संबंधी माहिती

| अ. क्र. | शिक्षक संख्या | प्रतिसादक शिक्षक संख्या | | शेकडा प्रमाण | |
|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्री | पुरुष | स्त्री |
| १. | शिक्षक संख्या | ३२ | १८ | ६४.००% | ३६.००% |
| २. | किमान अध्ययन कोर्स झालेल्या शिक्षकांची संख्या | ३२ | १८ | ६४.००% | ३६.००% |

कोष्टक क्रमांक - ५.०४ वरुन असे दिसून येते की, पुरुष व स्त्री शिक्षकांचे प्रमाण ३२ : १८ आहे. किमान अध्ययन क्षमता कोर्स १००% शिक्षकांचा झालेला दिसून येतो. ही बाब समाधानकारक आहे.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक १२ मध्ये क्षमता चाचणीचे स्वरुप कसे असावे ? असा प्रश्न विचारला होता. त्यास शिक्षकांनी दिलेला प्रतिसाद पुढील कोष्टक क्रमांक - ५.०५ मध्ये दाखविलेला आहे.

## कोष्टक क्रमांक - ५.०५

## क्षमता चाचणीच्या स्वरुपाविषयी माहिती

| अ. क्र. | क्षमता चाचणीचे स्वरुप | प्रतिसादक शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | लेखी, तोंडी, प्रात्यक्षिक | ४६ | ९२. ००% |
| २. | फक्त लेखी व तोंडी | ०२ | ०४.००% |
| ३. | फक्त तोंडी व प्रात्यक्षिक | ०१ | ०२.००% |
| ४. | फक्त लेखी | ०० | ०% |
| ५. | याशिवाय | ०० | ०% |

कोष्टक क्रमांक - ५.०५ वरुन असे दिसून येते की, 'लेखी, तोंडी, प्रात्यक्षिक असे क्षमता चाचणीचे स्वरुप असावे ' असे मत ९२.००% शिक्षकांनी व्यक्त केले आहे.

'फक्त लेखी व तोंडी असे क्षमता चाचणीचे स्वरुप असावे ' मत ०४.००% शिक्षकांना वाटते. फक्त तोंडी व प्रात्यक्षिक व फक्त लेखी क्षमता चाचणीचे स्वरुप नसावे. अनुक्रमे ९६.००% व ९८.००% शिक्षकांनी आपले मत व्यक्त केले आहे. यावरुन क्षमता चाचणीचे स्वरुप लेखी, तोंडी, प्रात्यक्षिक आहे.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक १३ मध्ये क्षमता चाचणी तयार करण्यापूर्वी संविधान तक्ता तयार करावा का? असा प्रश्न विचारला होता. त्याबाबत शिक्षकांनी दिलेला प्रतिसाद पुढील कोष्टक क्रमांक - ५.०६ मध्ये दाखविलेला आहे.

## कोष्टक क्रमांक - ५.०६

## संविधान तक्ता माहिती

| अ. क्र. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय. | ५० | १००% |
| २. | नाही. | ०० | ०% |

वरील कोष्टक क्रमांक - ५.०६ मध्ये असे दिसून येते की, क्षमता चाचणी तयार करण्यापूर्वी संविधान तक्ता तयार करावा असा १००% शिक्षकांनी प्रतिसाद दिला. ही बाब समाधानकारक आहे.

यावरुन संशोधकास असे वाटते की, संविधान तक्ता तयार केल्यामुळे सर्व घटकांना समान महत्त्व प्राप्त होते व सर्व प्रश्न प्रकारांचा समावेश करता येतो. तसेच सर्व प्रश्नांना योग्य प्रकारे गुणदान करता येते, आणि क्षमता चाचणी तयार करताना संविधान तक्ता तयार केल्यास क्षमता चाचणीमध्ये सप्रमाणता, वस्तुनिष्ठता, विश्वसनीयता, काठिण्यपातळी दिसून येते.

प्रश्नावली प्रश्न क्रमांक १४ मध्ये अभ्यासक्रमातील दोन महिन्याच्या कालावधीत प्रत्येक क्षमतेवर किती प्रश्न विचारावेत ? असा प्रश्न विचारला होता. त्यास शिक्षकांनी दिलेला प्रतिसाद पुढील कोष्टक क्रमांक - ५.०७ मध्ये दाखविलेला आहे.

## कोष्टक क्रमांक - ५.०७

## अभ्यासक्रमातील क्षमतेवर प्रश्नांची संख्या

| अ. क्र. | प्रश्न संख्या | प्रतिसादक शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | तीन | ०० | ०% |
| २. | चार | ०० | ०% |
| ३. | पाच | ४१ | ८२.००% |
| ४. | पेक्षा जास्त | ०० | ०% |
| ५. | याशिवाय | ०० | ०% |

वरील कोष्टक क्रमांक - ५.०७ मध्ये क्षमता चाचणी तयार करताना तीन व चार प्रश्न विचारावेत, यास १००% शिक्षकांचा नकारात्मक प्रतिसाद मिळाला.

पाच प्रश्न विचारावेत यास ८२.००% शिक्षकांचा प्रतिसाद मिळाला.

यावरुन संशोधकास असे वाटते की, अभ्यासक्रमातील क्षमतेवर पाच प्रश्न विचारावेत त्यापेक्षा जास्त प्रश्न विचारू नयेत.

प्रश्नावली प्रश्न क्रमांक १५ मध्ये क्षमता चाचणी तयार करताना कोणत्या बाबी विचारात घ्याव्यात ? असा प्रश्न विचारला होता. त्यास शिक्षकांनी दिलेला प्रतिसाद पुढील कोष्टक क्रमांक ५.०८ मध्ये दाखविलेला आहे.

**कोष्टक क्रमांक ५.०८**

**क्षमता चाचणी तयार करताना विचारात घ्यावयाच्या बाबी**

| अ. क्र. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | वयोगट - क्षमता | ३० | ६०.००% |
| २. | अभ्याक्रम कालावधी | ४० | ८०.००% |
| ३. | प्रश्नांचे स्वरुप | २५ | ५०.००% |
| ४. | याशिवाय | ०० | ०% |

कोष्टक क्रमांक - ५.०८ वरुन असे दिसून येते की, ' अभ्यासक्रम कालावधी ' व ' वयोगट क्षमता ' यास अनुक्रमे ८०.००% व ६०.००% शिक्षकांनी प्रतिसाद दिला.

' प्रश्नांचे स्वरुप ' यास ५०.००% शिक्षकांचा प्रतिसाद मिळाला.

यावरून संशोधकास असे वाटते की, वर्षातून चार क्षमता चाचण्या घ्याव्यात. त्या चाचणीव्दारे तपासावयाच्या क्षमतांची निवड करून यादी करावी., क्षमतांची व्याप्ती, प्रश्नांचे स्वरूप, प्रश्नसंच तयार करून, प्रश्नाची भाषा सहज, सोपी आणि सुस्पष्ट असावी.वयोगट, अभ्यासक्रम कालावधी यांचा विचारकरून क्षमता चाचणी तयार करावी.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक १६ मध्ये क्षमता चाचणी तयार करताना कोणत्या प्रश्न प्रकारांना महत्त्व द्यावे ? असा प्रश्न विचारला होता. त्याबाबत शिक्षकांनी दिलेला प्रतिसाद पुढील कोष्टक क्रमांक - ५.०९ मध्ये दाखविलेला आहे.

**कोष्टक क्रमांक ५.०९**

**क्षमता चाचणी तयार करताना प्रश्न प्रकारांचे महत्त्व**

| अ. क्र. | प्रश्न प्रकार | प्रतिसादक शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | वस्तुनिष्ठ | ५० | १००% |
| २. | लघुत्तरी | ५० | १००% |
| ३. | दीर्घोत्तरी | ५० | १००% |

कोष्टक क्रमांक - ५.०९ मध्ये असे दिसून येते की, क्षमता चाचणी तयार करताना सर्वच प्रश्न प्रकारांना

महत्त्व द्यावे. जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांनी वरील सर्वच प्रश्न प्रकारांना १००% प्रतिसाद दिला आहे.

यावरुन संशोधकास असे वाटते की, क्षमता चाचणी तयार करताना वस्तुनिष्ठ, लघुत्तरी, दीर्घोत्तरी प्रश्न प्रकारांना काठिण्य पातळीनुसार महत्त्व देऊन क्षमता चाचणी तयार करताना त्यांचा समावेश करावा.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक १७ मध्ये क्षमता चाचणीची रचना करताना कोणत्या बाबी विचारात घ्याव्यात ? असा प्रश्न विचारला होता. त्याबाबत शिक्षकांनी दिलेला प्रतिसाद पुढील कोष्टक क्रमांक - ५.१० मध्ये दाखविलेला आहे.

**कोष्टक क्रमांक ५.१०**

**क्षमता चाचणीची रचना करताना विचारात घ्यावयाच्या बाबी**

| अ. क्र. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | प्रश्नांची भाषा, सहज सुलभ असावी. | ३० | ६०.००% |
| २. | प्रश्नांची रचना सुटसुटीत असावी. | ४० | ८०.००% |
| ३. | प्रश्न काठिण्य पातळीनुसार चढत्या क्रमाने असावेत. | २५ | ५०.००% |
| ४. | प्रश्नातील सूचना स्पष्ट असाव्यात. | ५० | १००% |
| ५. | याशिवाय. | ०० | % |

कोष्टक क्रमांक - ५.१० मध्ये असे दिसून आले की, क्षमता चाचणी तयार करताना विचारात घ्यावयाच्या बाबी. या समस्याबाबत जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांनी ' प्रश्नांतील सूचना स्पष्ट असाव्यात ' यास १००% प्रतिसाद दिला. ' प्रश्नांची रचना सुटसुटीत असावी ' , यास ८०.००% प्रतिसाद मिळाला. ' प्रश्नांची भाषा, सहज सुलभ, असावी. ' आणि ' प्रश्न काठिण्यपातळीनुसार चढत्या क्रमाने असावेत. ' , यास अनुक्रमे ६०.००% व ५०.००% प्रतिसाद मिळाला.

यावरुन संशोधकास असे वाटते की, क्षमता चाचणी तयार करताना शिक्षकांनी प्रश्नाची रचना सुटसुटीत ठेवून , प्रश्नातील सूचना स्पष्ट करून , वरील प्रश्नांचा विचार करुन जिल्हा परिषद शाळातील क्षमता चाचणी तयार करावी. व त्यात सर्वांचा सहभाग घ्यावा.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक १८ मध्ये क्षमता चाचणी कोणत्या स्तरात तयार केल्या जाव्यात ? असा प्रश्न विचारला होता. त्यबाबत शिक्षकांनी दिलेला प्रतिसाद पुढील कोष्टक क्रमांक - ५.११ मध्ये दाखविलेला आहे.

## कोष्टक क्रमांक - ५.११

## क्षमता चाचणीचा स्तर

| अ. क्र. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | जिल्हास्तर | ०९ | १८.००% |
| २. | तालुकास्तर | ३६ | ७२.००% |
| ३. | शाळानिहाय | ५० | १००% |
| ४. | याशिवाय | ०० | ०% |

कोष्टक क्रमांक - ५.११ मध्ये असे दिसून आले की, क्षमता चाचणीचा स्तर कसा असावा यासाठी 'शाळानिहाय' साठी १००% शिक्षक तर 'तालुकास्तर' ७२.००% शिक्षकांनी प्रतिसाद दिला.

तर 'जिल्हास्तर' यासाठी १८.००% शिक्षकांनी प्रतिसाद दिला. यावरुन संशोधकास असे वाटते की, शाळानिहाय स्तरावर क्षमता चाचणी तयार केल्यास अभ्यासक्रमांनुसार, घटकानुसार, विद्यार्थ्यांची बौध्दिक पातळी, कालावधी यांचा विचार करून निर्दोष क्षमता चाचणी तयार करता येईल हे पहावे.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक १९ मध्ये क्षमता चाचणी तयार करताना कोणकोणत्या समस्या येतात ?असा प्रश्न विचारला होता.त्याबाबतचा उपप्रश्न १९.१ चा प्रतिसाद कोष्टक क्रमांक - ५.१२ मध्ये दाखविलेला आहे.

## कोष्टक क्रमांक - ५.१२

## संपूर्ण चाचणीतील समस्या

| अ. क्र. | समस्या | प्रतिसादक शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | एका चाचणीत फक्त १० क्षमतांचा समावेश होत असल्याने पाठ्यपुस्तकांतील त्या चाचणी दरम्यान इतर क्षमता उपेक्षीत राहतात. | ४२ | ८४.००% |
| २. | चाचणीची रचना, लेखी, तोंडी, प्रात्यक्षिक अशी असल्याने लेखी असेल असे नाही. | ४८ | ९६.००% |
| ३. | तोंडी, प्रात्यक्षिक जास्त गुण असल्याने जास्त प्रश्न क्षमता चाचणीत येतात. | १८ | ३६.००% |
| ४. | काही विषयात ४० पेक्षा जास्त क्षमता असल्याने उरलेल्या क्षमता वर्षभर चाचणीत येतच नाहीत. | ४० | ८०.००% |

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | चाचणी तयार करताना शिक्षकास स्वायत्ता नाही. | ४० | ८०.००% |
| ६. | काही विषयामध्ये क्षमता ४० पेक्षा कमी असल्यानेकाही क्षमता दोनदा चाचणीत घेऊन त्यावरील प्रश्न काढावे लागतात. | ४१ | ८२.००% |
| ७. | चाचणीची रचना लेखी, तोंडी, प्रात्यक्षिक अशी असलेने प्रश्नाच्या काठिण्य पातळीचा विचार होत नाही. | ४४ | ८८.००% |
| ८. | एकंदरीत क्षमता चाचणी काढणे हे शिक्षकाला अत्यंत कठीण काम वाटते. | १७ | ३४.००% |

वरील कोष्टक क्रमांक - ५.१२ मध्ये असे दिसून येते की, संपूर्ण चाचणी तयार करताना शिक्षकांना अनेक समस्या येतात. शिक्षकांना क्षमता चाचणीचे स्वरूप लेखी, तोंडी, प्रात्यक्षिक असे ठेवावे लागते. त्यामुळे त्यांना समस्या येतात.

'चाचणीची रचना लेखी, तोंडी, प्रात्यक्षिक अशी असल्याने लेखी असेल असे नाही.' ही समस्या ९६.००% शिक्षकांना आली. तर 'चाचणीची रचना लेखी, तोंडी, प्रात्यक्षिक अशी असलेने प्रश्नाच्या काठिण्य पातळीचा विचार होत नाही.' ही समस्या ८८.००% शिक्षकांना जाणवली. 'एका चाचणीत फक्त १० क्षमतांचा समावेश होत असल्याने पाठ्यपुस्तकातील त्या चाचणी दरम्यान इतर क्षमता अपेक्षित राहतात.' ही समस्या ८४.००% शिक्षकांना आली. 'काही विषयामध्ये क्षमता ४० पेक्षा कमी असल्याने काही क्षमता दोनदा चाचणीत घेऊन त्यावरील प्रश्न काढावे लागतात.' ही समस्या ८२.००% शिक्षकांना आली.

'चाचणी तयार करताना शिक्षकांना स्वायत्ता नाही.' व 'काही विषयात ४० पेक्षा जास्त क्षमता असल्याने उरलेल्या क्षमता वर्षभर चाचणीत येतच नाहीत.' ही समस्या अनुक्रमे ८०.००% व ८०.००% शिक्षकांना आली. 'तोंडी, प्रात्यक्षिक जास्त गुण असल्याने जास्त प्रश्न क्षमता चाचणीत येतात.' आणि 'एकंदरीत क्षमता चाचणी काढणे हे शिक्षकाला अत्यंत कठीण काम वाटते.' या समस्येला अनुक्रमे ३६.००% व ३४.००% शिक्षकांना आली.

यावरून संशोधकास असे वाटते की, क्षमता चाचणीचे स्वरूप , लेखी, तोंडी, प्रात्यक्षिक असेलच असे नाही. त्यामुळे एकंदरीत क्षमता चाचणी काढणे हे शिक्षकाला कठीण काम वाटत असले तरी योग्य नियोजन करून समस्या सोडवून त्याचे निराकरण करावे.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक १९ मध्ये उपप्रश्न क्रमांक - १९.२ मध्ये असा प्रश्न विचारला होता की, क्षमता चाचणीतील लेखी प्रश्न काढण्यासंबंधी समस्या सांगा ? त्या बाबतचा शिक्षकांनी दिलेला प्रतिसाद कोष्टक क्रमांक - ५.१३ मध्ये दाखविलेला आहे.

**कोष्टक क्रमांक - ५.१३**

**क्षमता चाचणीतील लेखी प्रश्न काढणे संबंधी समस्या**

| अ.क्र. | समस्या | प्रतिसादक शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | सर्व क्षमतावर लेखी प्रश्न काढता येतात. | १४ | २८.००% |
| २. | काही क्षमतावर लेखी प्रश्न काढता येत नाहीत. | ४६ | ९२.००% |
| ३. | काही क्षमतावर लेखी प्रश्न काढता येतात. | ३२ | ६४.००% |
| ४. | काही क्षमतावर अजिबात लेखी प्रश्न काढता येत नाहीत. | २४ | ४८.००% |
| ५. | क्षमताधिष्ठित लेखी प्रश्न काढणे ही अत्यंत किचकट बाब आहे. | ०९ | १८.००% |
| ६. | क्षमताधिष्ठित लेखी प्रश्न काढणे सोपी बाब आहे. | ४२ | ८२.००% |

वरील कोष्टक क्रमांक - ५.१३ मध्ये असे दिसून येते की, ' काही क्षमतावर लेखी प्रश्न काढता येत नाहीत' या विधानास ९२.००% शिक्षकांनी प्रतिसाद दर्शविला आहे. तर ' क्षमताधिष्ठित लेखी प्रश्न काढणे सोपी बाब आहे ' ही समस्या ८२.००% शिक्षकांना आली. तर ' क्षमताधिष्ठित लेखी प्रश्न काढणे ही अत्यंत किचकट बाब आहे ' ही समस्या ८२.००% शिक्षकांनी नाकारली.

' काही क्षमतावर लेखी प्रश्न काढता येतात.' ६४.००% शिक्षकांनी प्रतिसाद दिला. ' काही क्षमतावर अजिबात लेखी प्रश्न काढता येत नाहीत.' ४८.००% शिक्षकांनी प्रतिसाद दिला. सर्व क्षमतावर लेखी प्रश्न काढता येतात यास अत्यंत अल्प प्रतिसाद २८.००% मिळाला. यावरुन संशोधकास असे दिसून येते की, क्षमताधिष्ठित अभ्यासक्रमांच्या मूल्यमापनासाठीही वर्षातून चार क्षमता चाचण्या घ्याव्यात. व त्यात लेखी, तोंडी, प्रात्यक्षिक प्रश्नांचा समावेश करावा.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक १९ मध्ये उपप्रश्न क्रमांक - १९.३ क्षमता चाचणीतील तोंडी प्रश्न काढणे संबंधी समस्या विचारल्या होत्या. त्या बाबतचा शिक्षकांनी दिलेला प्रतिसाद कोष्टक क्रमांक - ५.१४ मध्ये दाखविलेला आहे.

**कोष्टक क्रमांक - ५ .१४**

**क्षमता चाचणीतील तोंडी प्रश्न काढणे संबंधी समस्या**

| अ. नं. | समस्या | प्रतिसादक शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | तोंडी प्रश्न क्षमतावर काढता येतात. | ४७ | ९४.००% |
| २. | तोंडी प्रश्न काही क्षमतावरच काढता येतात. | ४२ | ८४.००% |
| ३. | तोंडी प्रश्न ओढून ताणूनच काढावे लागतात. | ०५ | १०.००% |

कोष्टक क्रमांक - ५.१४ वरून असे दिसून येते की , ' तोंडी प्रश्न क्षमतावर काढता येतात ' ही समस्या ९४.००% शिक्षकांनी क्षमताधितिष्ठ चाचणीत आली तर ' तोंडी प्रश्न काही क्षमतावरच काढता येतात ' या समस्येला ८४.००% शिक्षकांनी प्रतिसाद दिला. ' तोंडी प्रश्न ओढून ताणूनच काढावे लागतात ' यास १०.००% शिक्षकांनी प्रतिसाद दर्शविला. यावरून संशोधकास असे वाटते की, शिक्षकांनी क्षमता, क्षेत्र, घटक यांचा विचार प्रामुख्याने करूनच मग क्षमता चाचणी काढावी. क्षमता चाचणीत लेखी गुणाइतकेच गुण तोंडी प्रश्नांना द्यावेत.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक १९ मध्ये उपप्रश्न १९.४ मध्ये क्षमता चाचणीतील प्रात्यक्षिक प्रश्न काढणे संबंधी समस्या सांगा ? असा प्रश्न विचारला होता. त्याबाबत शिक्षकांनी दिलेला प्रतिसाद पुढील कोष्टक क्रमांक - ५.१५ मध्ये दाखविलेला आहे.

**कोष्टक क्रमांक ५.१५**

**क्षमता चाचणीतील प्रात्यक्षिक प्रश्न काढणे संबंधी समस्या**

| अ. नं. | समस्या | प्रतिसादक शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | एखाद्या क्षमतेवर प्रात्यक्षिक प्रश्न काढता येत नाहीत. | ४८ | ९६.००% |
| २. | बऱ्याच क्षमतांवर प्रात्यक्षिक प्रश्न काढताना ते ओढून ताणूनच काढावे लागतात. | ३२ | ६४.००% |
| ३. | प्रात्यक्षिक प्रश्न चाचणीत असावेत म्हणूनच फक्त काढतात. | ४० | ८०.००% |
| ४. | प्रात्यक्षिक प्रश्न पाठ्यपुस्तकाबाहेरीलच काढावे लागतात. | ४० | ८०.००% |

वरील कोष्टक क्रमांक - ५.१५ मध्ये असे दिसून येते की, ' एखाद्या क्षमतेवर प्रात्यक्षिक प्रश्न काढता येत नाहीत. ' ही समस्या ९६.०० % शिक्षकांना आली . तर ' बऱ्याच क्षमतांवर प्रात्यक्षिक प्रश्न काढताना ते ओढून ताणूनच काढावे लागतात ' या समस्येला ९४.००% शिक्षकांनी प्रतिसाद दिला.

' प्रात्यक्षिक प्रश्न चाचणीत असावेत म्हणूनच फक्त काढतात ' व ' प्रात्यक्षिक प्रश्न पाठ्यपुस्तकाबाहेरीलच काढावे लागतात ' या दोन्ही समस्यांना अनुक्रमे ८०.००% व ८०.००% शिक्षकांनी स्विकारले आहे.

यावरून संशोधकास असे वाटते की, क्षमता चाचणीची रचना लेखी, तोंडी, प्रात्यक्षिक अशी असल्याने त्या चाचणीमध्ये प्रात्यक्षिक प्रश्नाचा ही समावेश शिक्षकांनी करावा.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक - २० मध्ये सामान्य क्षमता चाचणी शाळानिहाय लवचिक असते का ? असा प्रश्न विचारला होता. त्याबाबतचा शिक्षकांनी दिलेला प्रतिसाद पुढील कोष्टक क्रमांक - ५.१६ मध्ये दाखविलेला आहे.

**कोष्टक क्रमांक - ५.१६**

**क्षमताचाचणी शाळानिहाय लवचिकता असते शिक्षकांचे मत**

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरूप | शिक्षक प्रतिसादक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय. | ०२ | ०४.००% |
| २. | नाही. | ४८ | ९६.००% |
| ३. | एकूण | ५० | १००.००% |

कोष्टक क्रमांक - ५.१६ वरून असे दिसून येते की,' क्षमता चाचणी शाळानिहाय लवचिक असते का ? ' या समस्येला ०४.०० % शिक्षकांनी प्रतिसाद दिला असून ९६.००% शिक्षकांनी लवचिकता नसते असा प्रतिसाद दिला.

यावरून संशोधकास असे वाटते की, या सर्वांमुळे सर्वच शिक्षकांनी क्षमता चाचणी शाळानिहाय काढण्याचा प्रयत्न करावा.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक २२ मध्ये सामान्य प्रश्नपत्रिकेमुळे कोणकोणत्या समस्या निर्माण होतात ? असा प्रश्न विचारला होता. त्याबाबत शिक्षकांनी दर्शविलेला प्रतिसाद पुढील कोष्टक क्रमांक - ५.१७ मध्ये दाखविलेला आहे.

**कोष्टक क्रमांक - ५.१७**

**सामान्य प्रश्नपत्रिकेमुळे निर्माण होणाऱ्या समस्या**

| अ. नं. | समस्या | प्रतिसादक शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | सामान्य प्रश्नपत्रिकामुळे शिक्षकांना स्वयं प्रश्न काढण्यास वाव मिळत नाही. | ४७ | ९४.००% |
| २. | सामान्य प्रश्नपत्रिकांच्या छपाईत अनेक दोष असतात. | ३७ | ७४.००% |
| ३. | सामान्य प्रश्नपत्रिकासोबत उत्तरपत्रिका नसते, त्यामुळे प्रश्नपत्रिका काढण्यास अपेक्षित उत्तराची दिशा तपासणीसास मिळत नाही. | ४४ | ८८.००% |
| ४. | सामान्य प्रश्नपत्रिकेत शालेय पातळीवर लवचिकतेस अजिबात वाव नसतो. | ४२ | ८४.००% |
| ५. | सामान्य परीक्षे वेळेस शिक्षक रजेवर असल्यास क्षमताधिष्ठित मूल्यमापनात इतर शिक्षकांना समस्या निर्माण होतात. शिक्षकांच्या अडचणींचा सामान्य प्रश्नपत्रिकात विचार नसतो. | ४० | ८०.००% |
| ६. | सामान्य प्रश्नपत्रिकांच्या समस्यांना शिक्षक व विद्यार्थी दोघेही बळी पडतात. | ४४ | ८८.००% |
| ७. | सामान्य प्रश्नपत्रिकात प्रश्नातील कठीण पातळीचा विचार नसतो. | ३५ | ७०.००% |

वरील कोष्टक क्रमांक - ५.१७ वरून असे दिसून येते की, सामान्य प्रश्नपत्रिकामुळे निर्माण होणाऱ्या समस्यामध्ये, ' सामान्य प्रश्नपत्रिकामुळे शिक्षकांना स्वयं प्रश्न काढण्यास वाव मिळत नाही.' या समस्येला ९४.००% शिक्षकांनी प्रतिसाद दिला. ' सामान्य प्रश्नपत्रिकामुळे सोबत उत्तरपत्रिका नसते, त्यामुळे प्रश्ननपत्रिका काढण्यास अपेक्षित उत्तराची दिशा तपासणीसास मिळत नाही.' व ' सामान्य प्रश्नपत्रिकांच्या समस्यांना शिक्षक व विद्यार्थी दोघेही बळी पडतात. ' या समस्येला अनुक्रमे ८८.००% व ८८.००% प्रतिसाद मिळाला.' सामान्य प्रश्नपत्रिकेत शालेय पातळीवर लवचिकतेस अजिबात वाव नसतो. ' यास ८४.००% शिक्षकांचा प्रतिसाद मिळाला.

तसेच ' सामान्य प्रश्नपत्रिकांच्या छपाईत अनेक दोष असतात.' व ' सामान्य प्रश्नपत्रिकात प्रश्नांतील कठीण पातळीचा विचार नसतो. ' या दोन्ही समस्येला अनुक्रमे ७४.०० % व ७०.०० % शिक्षक प्रतिसाद मिळाला.

यावरून संशोधकास असे वाटते की, जि. प. प्राथ. शाळेत परीक्षा ही सार्वजनिक स्वरूपाची असते .तसेच तालुक्यासाठी एक स्वतंत्र मंडळ असते. त्याऐवजी प्रत्येक शाळेने किंवा केंद्राने आपल्या स्वतंत्र प्रश्नपत्रिका काढून विद्यार्थ्यांच्या परीक्षा घ्याव्यात.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक २३ मध्ये क्षमता चाचणीतील तोंडी प्रश्नांच्या मूल्यमापनात कोणत्या अडचणी येतात ? असा प्रश्न विचारला होता. त्याबाबत शिक्षकांनी दिलेला प्रतिसाद पुढील कोष्टक क्रमांक - ५.१८ मध्ये दाखविलेला आहे.

**कोष्टक क्रमांक - ५.१८**

**क्षमता चाचणीतील तोंडी प्रश्नाच्या मूल्यमापनातील अडचणी**

| अ. नं. | अडचणीचे स्वरूप | प्रतिसादक शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | मूल्यमापन एकाच वेळी करता येत नाही. | ५० | १००% |
| २. | प्रश्नांची पुनरावृत्ती होते. | ४० | ८०.००% |
| ३. | शेजारच्या विद्यार्थ्याने ऐकल्यास मूल्यमापन योग्य होत नाही. | ३५ | ७०.००% |
| ४. | संपूर्ण वर्गाच्या मूल्यमापनात वेळ जातो. त्यामुळे शिक्षकास थकवा येतो. | ५० | १००% |
| ५. | याशिवाय | ०० | ०% |

कोष्टक क्रमांक - ५.१८ वरून असे दिसून येते की, ' मूल्यमापन एकाच वेळी करता येत नाही.' या समस्येस व ' संपूर्ण वर्गाच्या मूल्यमापनात वेळ जातो. त्यामुळे शिक्षकास थकवा येतो. ' या दोन्ही समस्येला १००% शिक्षकांनी प्रतिसाद दिला.


' प्रश्नांची पुनरावृत्ती होते.' व ' शेजारच्या विद्यार्थ्याने ऐकल्यास मूल्यमापन योग्य होत नाही.' या समस्येला अनुक्रमे ८०.०० % व ७०.०० % शिक्षकांचा प्रतिसाद मिळाला.

यावरून संशोधकास असे वाटते की, मूल्यमापन करते वेळी शिक्षकांनी आपल्या नियोजनात मूल्यमापन तासिकांचे नियोजन, वेळेचे नियोजन, कामाचे नियोजन करावे म्हणजे शिक्षकांना कमी समस्या जाणवतील व कामात रममाण झाल्यास कंटाळा व थकवा जाणवणार नाही.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक २४ मध्ये क्षमता चाचणीतील प्रात्यक्षिक प्रश्नाच्या मूल्यमापनात कोणत्या अडचणी येतात ? हा प्रश्न विचारला होता त्याबाबत शिक्षकांनी दिलेला प्रतिसाद पुढील कोष्टक क्रमांक - ५.१९ मध्ये दाखविलेला आहे.

## आलेख क्रमांक - ५.०३

## अध्ययन निष्पत्ती बाबत शिक्षकांचे मत



## कोष्टक क्रमांक - ५.१९

## क्षमता चाचणीतील प्रात्यक्षिक प्रश्नांच्या मूल्यमापनातील अडचणी

| अ. नं. | अडचणीचे स्वरूप | प्रतिसादक शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | वेळखाऊ | ४२ | ८४.००% |
| २. | श्रमखाऊ | ३९ | ७८.००% |
| ३. | बौद्धिक | ३० | ६०.००% |
| ४. | व्यक्तिनिष्ठता | ३८ | ७६.००% |
| ५. | साहित्य उपलब्ध नसणे. | १३ | २६.००% |
| ६. | याशिवाय | ०० | ०% |

कोष्टक क्रमांक - ५.१९ वरून असे दिसून येते की, ' वेळ खाऊ ' व ' श्रम खाऊ ' या समस्येला अनुक्रमे ८४.०० % व ७८.०० % शिक्षकांचा प्रतिसाद दिला.

तसेच ' व्यक्तिनिष्ठता ' यास ७६.०० % प्रतिसाद शिक्षकांचा लाभला. ' साहित्य उपलब्ध नसणे ' या समस्येला २६.०० % शिक्षकांचा प्रतिसाद मिळाला.

यावरूप संशोधकास असे वाटते की, प्रात्यक्षिक प्रश्नपत्रिकांचे मूल्यमापन करण्या अगोदर शिक्षकांनी वेळ, शैक्षणिक साहित्य उपलब्ध, श्रम यांचे नियोजन करून विद्यार्थ्यांकडून तशी तयारी करून घ्यावी.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक २५ मध्ये विद्यार्थ्यांचे वय , त्याच्या अध्यापनाचा टप्पा व त्याला अनुसरून ठरवलेली अध्ययन निष्पत्ती योग्य आहे काय ? असा प्रश्न विचारला होता. त्याबाबत शिक्षकांचा प्रतिसाद कोष्टक क्रमांक - ५.२० मध्ये दाखविलेला आहे.

## कोष्टक क्रमांक - ५.२०


## अध्ययन निष्पत्ती बाबत शिक्षकांचे मत

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरूप | प्रतिसादक शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय. | ४५ | ९०.००% |
| २. | नाही. | ०५ | १०.००% |
| ३. | एकूण | ५० | १००% |

कोष्टक क्रमांक - ५.२० वरून असे दिसून येते की, ' विद्यार्थ्यांचे वय , त्याचा अध्ययनाचा टप्पा व त्याला अनुसरून ठरवलेली अध्ययन निष्पत्ती योग्य आहे का ? ' या समस्येला ९०.००% शिक्षकांनी प्रतिसाद दिला.

**आलेख क्रमांक - ५.०४**

**क्षमताधिष्ठित अध्यापनासाठी अध्यापन पद्धतीची उपयुक्तता**




अध्यापन पद्धतीचे उपयुक्तता टक्केवारी

यावरून संशोधकास असे वाटते की, अध्ययन निष्पत्तीवर अध्यापन पद्धती परिणाम करत असते त्यामुळे अध्ययन निष्पत्ती महत्त्वाची ठरते.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक २६ मध्ये आपण ज्या पद्धतीचा वापर करतो त्या अध्यापन पद्धती क्षमताधिष्ठित अध्यापनास कितपत उपयुक्त आहे ? असा प्रश्न विचारल होता . त्याबाबत शिक्षकांचा प्रतिसाद पुढील कोष्टक क्रमांक - ५.२१ मध्ये दाखविलेला आहे.

**कोष्टक क्रमांक - ५.२१**

**क्षमताधिष्ठित अध्यापनासाठी अध्यापन पद्धतीची उपयुक्तता**

| अ. नं. | अध्यापन पद्धतीची उपयुक्तता टक्केवारी | प्रतिसादक शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | १००% | ०८ | १६.००% |
| २. | ७५ % पेक्षा जास्त | ४६ | ९२.००% |
| ३. | ५०% पेक्षा जास्त | ४२ | ८४.००% |
| ४. | २५ % पेक्षा जास्त | २२ | ४४.००% |
| ५. | याशिवाय | ०० | ०% |

कोष्टक क्रमांक ५.२१ मध्ये असे दिसून येते की, ' अध्ययन पद्धतीची उपयुक्तता क्षमताधिष्ठत अध्यापनासाठी ७५% पेक्षा जास्त ', ९२.०० % शिक्षकांनी प्रतिसाद दिला.तर ' ५० % पेक्षा जास्त ' ८४.०० % शिक्षकांनी प्रतिसाद दिला.

तर ' २५ % पेक्षा जास्त ', ४४.०० % शिक्षकांनी व १००% , यास १६.००% एवढाच प्रतिसाद शिक्षकांनी दिला. यावरून संशोधकास असे वाटते की, क्षमताधिष्ठित अध्यापनात विषय, घटक, आशय यानुसार उपयुक्त अध्यापन पद्धती सर्व शिक्षकांनी निवडावी.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक २७ मध्ये शालेय वातावरण विद्यार्थ्यांच्या विकासास पोषक आहे का ? असा प्रश्न विचारला होता. त्याबाबत शिक्षकांनी दिलेला प्रतिसाद पुढील कोष्टक क्रमांक - ५.२२ मध्ये दाखविलेला आहे.

**कोष्टक क्रमांक - ५.२२**

**शालेय वातावरण विद्यार्थ्यांच्या विकासास पोषक आहे का ? याबाबत शिक्षकांचे मत**

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय. | ३८ | ७६.००% |
| २. | नाही. | १२ | २४.००% |
| ३. | एकूण | ५० | १००% |

कोष्टक क्रमांक - ५.२२ मध्ये असे दिसून येते की, शालेय वातावण विद्यार्थ्यांच्या विकासास पोषक आहे या विधानास ७६.००% शिक्षकांनी प्रतिसाद दिला. वातावरण प्रसन्न असल्यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडून येण्यास मदत होईल व अध्यापन आनंददायी होण्यास मदत होईल असे संशोधकास वाटते.

प्रश्नावली प्रश्न क्रमांक - २८ मध्ये क्षमता चाचणी तपासताना कोणत्या अडचणी येतात ? असा प्रश्न विचारला होता. त्यातील उपप्रश्न क्रमांक २८.१ त्यास शिक्षकांनी दिलेला प्रतिसाद पुढील कोष्टक क्रमांक -५.२३ मध्ये दाखविलेला आहे.

**कोष्टक क्रमांक - ५.२३**

**क्षमता चाचणी तपासणीतील समस्या - ( लेखी प्रश्न )**

| अ.नं. | समस्या | प्रतिसादक शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | एखाद्या क्षमतेवरील पाच ही उपप्रश्नात विद्यार्थ्यांना प्रत्येकी १/२ गुण मिळाल्यास त्या क्षमतेला निश्चित किती गुण द्यावेत हे समजत नाही. | ४२ | ८४.००% |
| २. | काही क्षमतावरील प्रश्नात (तीन उपप्रश्न एका वाक्यात उत्तरे द्या. ३ गुण व साठी ४ जोड्या जुळवा - २ गुण ) असे असतात. अशावेळी १/२ गुणांनी ही गुणदान करता येत नाही. असा प्रतिसाद नोंदी ही कशा घ्याव्यात हे समजत नाही. | ५० | १००% |
| ३. | एखाद्या क्षमतेत एका वाक्यात उत्तरे द्या. त्यामध्ये ३/४ शब्दांचे मूळ उत्तर असल्यास विद्यार्थ्यांनी २/३ शब्द बरोबर लिहल्यास गुणदान कसे व किती करावे हे समजत नाही. | ४४ | ८८.००% |

कोष्टक क्रमांक - ५.२३ वरून असे दिसून येते की, ' काही क्षमतावरील प्रश्नात (तीन उपप्रश्न एका वाक्यात उत्तरे द्या. ३ गुण व खाली ४ जोड्या जुळवा - २ गुण ) असे असतात अशावेळी १/२ अशा गुणांनी ही गुणदान करता येत नाही. असा प्रतिसाद नोंदी ही कशा घ्याव्यात हे समजत नाही.' ही समस्या १००% शिक्षकांना आली तर ' एखाद्या क्षमतेत एका वाक्यात उत्तरे द्या. त्यामध्ये ३/४ शब्दांचे मूळ उत्तर असल्यास विद्यार्थ्यांनी २/३ शब्द बरोबर लिहल्यास गुणदान कसे व किती करावे हे समजत नाही. ' या समस्येला ८८.००% शिक्षकांनी प्रतिसाद दिला.

तर ' एखाद्या क्षमतेवरील ५ ही उपप्रश्नात विद्यार्थ्यांस प्रत्येकी १/२ गुण मिळाल्यास त्या क्षमतेला निश्चित किती गुण द्यावेत हे समजत नाही. ' यास ८४.००% शिक्षकांनी प्रतिसाद दिला.

क्षमता चाचणी घेताना किंवा घेतल्यानंतर ती तपासणे हे सर्व शिक्षकांचे अत्यावश्यक काम असते. त्यातील समस्या सर्व शिक्षकांनी चर्चेद्वारे सोडवणूक करून घ्यावी ही अत्यंत महत्त्वाची गरज आहे असे संशोधकास वाटते.

प्रश्नावलीमध्ये प्रश्न क्रमांक २८ मध्ये उपप्रश्न क्रमांक २८.२ मध्ये क्षमता चाचणी तपासणीतील समस्या - ( तोंडी प्रश्न) असा प्रश्न विचारला होता. त्याबाबत शिक्षकांनी दिलेला प्रतिसाद पुढील कोष्टक क्रमांक - ५.२४ मध्ये दाखविलेला आहे.

**<u>कोष्टक क्रमांक - ५.२४</u>**

**<u>क्षमता चाचणी तपासणीतील समस्या - (तोंडी प्रश्न)</u>**

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | तोंडी प्रश्नांचे मूल्यमापन एकाच वेळी करता येत नाही.त्यामुळे वेळ खर्च होतो. | ४१ | ८२.००% |
| २. | तोंडी प्रश्न एखाद्या विद्यार्थ्यांला सांगताना दुसरा विद्यार्थी ऐकतो तो स्व:तचा नंबर येईपर्यंत उत्तर पाठ करतो. | ३२ | ६४.००% |
| ३. | एका क्षमतेवर प्रत्येकासाठी वेगवेगळे प्रश्न काढणे शक्य नसते. त्यामुळे बऱ्याच प्रश्नांची पुनरावृत्ती होते. | ४६ | ९२.००% |
| ४. | शिक्षकाला असे प्रश्न तपासण्यामध्ये मानसिक ताण स्पष्टपणे जाणवतो. | २८ | ५६.००% |
| ५. | विद्यार्थ्यांला ही परीक्षा कंटाळवाणी वाटते. त्याच्या मानसिकतेचा विचार केला गेला नाही. | ३० | ६०.००% |
| ६. | तोंडी परीक्षा कालावधीत अध्यापनाचे तास होत नाहीत. | ३९ | ७६.००% |

वरील कोष्टक क्रमांक - ५.२४ मध्ये असे दिसून येते की, ' एका क्षमतेवर प्रत्येकासाठी वेगवेगळे प्रश्न काढणे शक्य नसते. त्यामुळे बऱ्याच प्रश्नांची पुनरावृत्ती होते. ' ही समस्या ९२.००% शिक्षकांना फलटण तालुक्यात आली तर ' तोंडी प्रश्नांचे मूल्यमापन एकाचवेळी करता येत नाही.त्यामुळे वेळ खर्च होतो.' व ' तोंडी परीक्षा कालावधीत अध्यापनाचे तास होत नाहीत.' या दोन्ही समस्यांना अनुक्रमे ८२.००% व ७८.००% शिक्षकांनी प्रतिसाद दर्शविला.

' तोंडी प्रश्न एखाद्या विद्यार्थ्यांला सांगताना दुसरा विद्यार्थी ऐकतो तो स्व:तचा नंबर येईपर्यंत उत्तर पाठ करतो. ' ही समस्या ६४.००% शिक्षकांना जाणवली. ' विद्यार्थ्यांला ही परीक्षा कंटाळवाणी वाटते.त्याच्या मानसिकतेचा विचार केला गेला नाही. ' व ' शिक्षकाला असे प्रश्न तपासण्यामध्ये मानसिक ताण स्पष्टपणे जाणवतो. ' या दोन्ही समस्येला अनुक्रमे ६०.००% व ५६.००% शिक्षकांनी प्रतिसाद दिला.

यावरून संशोधकास असे वाटते की, क्षमताचाचणी तपासताना ज्या पद्धतीने लेखी प्रश्नांच्या बाबतीत शिक्षकाला समस्या येतात. तोंडी प्रश्नांच्या येत असतात. त्यांना पुरेसा वेळ मिळावा हीच अपेक्षा सर्वांची असते.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक २८ मध्ये उपप्रश्न क्रमांक २८.३ मध्ये - क्षमता चाचणी तपासणीतील समस्या - ( प्रात्यक्षिक प्रश्न ) सांगा ? असा प्रश्न विचारला होता. त्याबाबत शिक्षकांनी दिलेला प्रतिसाद पुढील कोष्टक क्रमांक - ५.२५ दाखविलेला आहे.

**कोष्टक क्रमांक - ५.२५**

**क्षमता चाचणीतील समस्या -( प्रात्यक्षिक प्रश्न )**

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | प्रात्यक्षिक प्रश्नांच्या मूल्यमापनास खूपच वेळ लागतो. | ५० | १००% |
| २. | एका प्रात्यक्षिक प्रश्नांला पाच गुणामध्ये कसे गुणदान करावे याचा उल्लेख चाचणीत नसतो. त्यामुळे व्यक्तिपरत्वे वेगळे निकष लागतात. | ४६ | ९२.००% |
| ३. | प्रात्यक्षिक परीक्षा काळात अध्यापनाचे कामकाज अजिबात होत नाही. | ४० | ८०.००% |
| ४. | प्रात्यक्षिक परीक्षेसाठी प्रत्येक विद्यार्थ्यांला प्रत्येक साहित्य शाळेत उपलब्ध होईलच असे नाही. | ४३ | ८६.००% |
| ५. | प्रात्यक्षिक घरी तयार करावयास सांगितल्यास विद्यार्थी थोर व्यक्तीकडून चांगले प्रात्यक्षिक करून गुण मिळवतो. | १३ | २६.००% |

| | | | |
|---|---|---|---|
| ६. | प्रात्यक्षिक परीक्षांचे गुणदान मूल्यमापन करताना शिक्षकांना मानसिक ताण स्पष्टपणे जाणवतो. | ३३ | ६६.००% |
| ७. | विद्यार्थ्यांनाही या परीक्षेस वेळ लागतो. ते ही कंटाळतात व त्याच्या बालमनावर मानसिक ताण येतो. | ३२ | ६४.००% |

वरील कोष्टक क्रमांक - ५.२५ वरून असे दिसून येते की, ' प्रात्यक्षिक प्रश्नांच्या मूल्यमापनास खूपच वेळ लागतो. ' यास शिक्षकांचा १००% प्रतिसाद मिळाला. ' एका प्रात्यक्षिक प्रश्नांला पाच गुणामध्ये कसे गुणदान करावे याचा उल्लेख चाचणीत नसतो. त्यामुळे व्यक्तिपरत्वे वेगळे निकष लागतात. ' यास ९२.००% प्रतिसाद शिक्षकांनी दिला.

तसेच ' प्रात्यक्षिक परीक्षेसाठी प्रत्येक विद्यार्थ्यांला प्रत्येक साहित्य शाळेत उपलब्ध होईलच असे नाही. ' व ' प्रात्यक्षिक परीक्षा काळात अध्यापनाचे कामकाज अजिबात होत नाही. ' या समस्येला अनुक्रमे ८६.००% व ८०.००% शिक्षकांनी प्रतिसाद दिला.

' प्रात्यक्षिक परीक्षांचे गुणदान मूल्यमापन करताना शिक्षकांना मानसिक ताण स्पष्टपणे जाणवतो. ' व ' विद्यार्थ्यांनाही या परीक्षेस वेळ लागतो. ते ही कंटाळतात व त्याच्या बालमनावर मानसिक ताण येतो.' या दोन्ही समस्येला अनुक्रमे ६६.०० व ६४.००% शिक्षकांनी प्रतिसाद दिला.

' प्रात्यक्षिक घरी तयार करावयास सांगितल्यास विद्यार्थी थोर व्यक्तीकडून चांगले प्रात्यक्षिक करून गुण मिळवतो. ' यास २६.००% शिक्षकांनी प्रतिसाद दिला.

यावरून संशोधकास असे वाटते की, क्षमता चाचणीचे मूल्यमापन करण्याअगोदर शिक्षकांनी लेखी , तोंडी, प्रात्यक्षिक प्रश्न तपासताना ज्या अडचणी येतात. त्या शिक्षकांतील चर्चेव्दारे, केंद्रस्तरावरील शिबिरात चर्चा घडवून आणून त्या अडचणी सोडवून घेवून मूल्यमापन योग्य व अचूक करून क्षमताधिष्ठित मूल्यमापन करावे.मूल्यमापन प्रक्रियेव्दारे विद्यार्थ्यांच्या आत्मसन्मानाला धक्का पोहचणार नाही , अशा हळूवारपणे मूल्यमापनाची प्रक्रिया घडत जावी.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक २८ मध्ये उपप्रश्न २८.४ मध्ये एकंदरीत चाचणी तपासणीतील समस्या सांगा ? असा प्रश्न विचारला होता. त्याबाबत शिक्षकांनी दिलेला प्रतिसाद पुढील कोष्टक क्रमांक - ५.२६ मध्ये दाखविलेला आहे.

## कोष्टक क्रमांक - ५.२६

## एकंदरीत चाचणी तपासणीतील समस्या

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | लेखी, तोंडी, प्रात्यक्षिक चाचणी परीक्षेचे एकाच वेळी मूल्यमापन करणे शक्य होत नाही. | ५० | १००% |
| २. | क्षमता चाचणी तपासण्यासाठी उत्तरपत्रिका बरोबर येत नाही. | ४२ | ८४.००% |
| ३. | क्षमता चाचणीला वेळ फक्त दोन तास असतो. पण दोन तासात लेखी, तोंडी, प्रात्यक्षिक परीक्षा उरकत नाही. | ४२ | ८४.००% |
| ४. | विद्यार्थी प्रतिसाद नोंदीस खुपच वेळ अपुरा पडतो. | ४२ | ८४.००% |
| ५. | क्षमता चाचणी सोबत गुणदान योजना पत्रिका नसते. | ३४ | ६८.००% |
| ६. | एकंदरीत अध्यापनापेक्षा मूल्यमापनास जास्त  वेळ खर्च होतो. | ३४ | ६८.००% |
| ७. | पर्यायाने मूल्यमापनात वस्तुनिष्ठता राहत नाही. | ३२ | ६४.००% |

वरील कोष्टक क्रमांक - ५.२६ वरून असे दिसून येते की, ‘ लेखी, तोंडी, प्रात्यक्षिक चाचणी परीक्षेचे एकाच वेळी मूल्यमापन करणे शक्य होत नाही. ’ या समस्येला १००% शिक्षकांनी प्रतिसाद दिला. तर ‘ क्षमता चाचणी तपासण्यासाठी उत्तरपत्रिका बरोबर येत नाही. ’ ‘ क्षमता चाचणीला वेळ फक्त दोन तास असतो.पण दोन तासात लेखी, तोंडी, प्रात्यक्षिक परीक्षा उरकत नाही. ’ आणि ‘ विद्यार्थी प्रतिसाद नोंदीस खुपच वेळ अपुरा पडतो. ’ या तिन्ही समस्येला अनुक्रमे ८४.००% व ८४.००% आणि ८४.००% शिक्षक प्रतिसाद मिळाला.

‘ क्षमता चाचणी सोबत गुणदान योजना पत्रिका नसते.’ यास व ‘ एकंदरीत अध्यापनापेक्षा मूल्यमापनास जास्त वेळ खर्च होतो. ’ या दोन्ही समस्येला अनुक्रमे ६८.००% व ६८.००% प्रतिसाद शिक्षकांचा मिळाला.

‘ पर्यायाने मूल्यमापनात वस्तुनिष्ठता राहत नाही. ’ या समस्येला ६४.०० % शिक्षकांनी प्रतिसाद दिला.

शिक्षकांनी चाचणी तपासताना काळजीपूर्वक तपासून क्षमताधिष्ठित अभ्याक्रमाचे मूल्यमापन तारेवरची कसरत न वाटता व्यवस्थित चाचणी तपासून मूल्यमापन होईल असे पाहावे असे संशोधकास वाटते.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक २८ मध्ये उपप्रश्न २८.५ मध्ये क्षमता चाचणीतील इतर समस्या सांगा ? असा प्रश्न विचारला होता. त्याबाबत शिक्षकांनी दिलेला प्रतिसाद पुढील कोष्टक क्रमांक - ५.२७ मध्ये दाखविलेला आहे.

**कोष्टक क्रमांक - ५.२७**

**क्षमता चाचणीतील इतर समस्या**

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | एखादा शिक्षक रजेवर असल्यास जबाबदार शिक्षक स्वत:चा वर्ग व इतरांचा वर्ग याचे एकावेळी मूल्यमापन करू शकत नाही. | ५० | १००% |
| २. | रजेवर असणाऱ्या शिक्षकाच्या वर्गाचे मूल्यमापन केवळ अधिकाऱ्याच्या भीती पोटीच केले जाते. | ४२ | ८४.००% |
| ३. | एखाद्या मुख्याध्यापकाकडे वर्ग असल्यास नियोजन व क्षमता चाचणी परीक्षा यांची सांगड घालताना त्याला खूप ताण पडतो. | ४२ | ८४.००% |
| ४. | अधिकारी शाळेच्या एकंदर परिस्थितीचा विचार न करता तपासणी करतो. | ४२ | ८४.००% |


कोष्टक क्रमांक - ५.२७ मध्ये असे दिसून येते की, ' एखादा शिक्षक रजेवर असल्यास जबाबदार शिक्षक स्वत:चा वर्ग व इतरांचा वर्ग याचे एकावेळी मूल्यमापन करू शकत नाही. ' ही समस्या फलटण तालुक्यातील १००% शिक्षकांनी प्रतिसाद दिला.

तसेच ' रजेवर असणाऱ्या शिक्षकाच्या वर्गाचे मूल्यमापन केवळ अधिकाऱ्याच्या भीती पोटीच केले जाते.' ' एखाद्या मुख्याध्यापकाकडे वर्ग असल्यास नियोजन व क्षमता चाचणी परीक्षा यांची सांगड घालताना त्याला खूप ताण पडतो.' व ' अधिकारी शाळेच्या एकंदर परिस्थितीचा विचार न करता तपासणी करतो. ' या तिन्ही समस्यांना ८४.००% शिक्षकांनी प्रतिसाद दिला.

क्षमता चाचणी काढताना शिक्षकाला लेखीप्रश्न, तोंडीप्रश्न, प्रात्यक्षिक प्रश्न काढून त्यांचे मूल्यमापन शिक्षकांनी निर्दोष बनवण्याचा शिक्षकांनी प्रयत्न करून क्षमता चाचणीतील इतर समस्या कशा सुटतील हे पहावे.

आलेख क्रमांक - ५.०५

चाचणी तपासून प्रत्याभरण करण्याबाबत शिक्षकांचे मत



प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक २९ मध्ये आपण चाचणी तपासून प्रत्याभरण करता कां ? असा प्रश्न विचारला असता शिक्षकांनी दिलेला प्रतिसाद पुढील कोष्टक क्रमांक - ५.२८ मध्ये दाखविलेला आहे.

**कोष्टक क्रमांक - ५.२८**

**चाचणी तपासून प्रत्याभरण करण्याबाबत शिक्षकांचे मत**

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय. | ४८ | ९६.००% |
| २. | नाही. | ०२ | ०४.००% |

वरील कोष्टक क्रमांक - ५.२८ वरून असे दिसून येते की, चाचणी तपासून प्रत्याभरण करण्याबाबत शिक्षकांनी या समस्येला ९६.००% प्रतिसाद दिला. बहुतेक शिक्षक प्रत्याभरण करतात असे संशोधकास जाणवते. ही बाब समाधानकारक आहे.

प्रश्नावलीत प्रश्नक्रमांक ३० मध्ये आपण चाचणी तपासून त्याची नोंद ठेवता का ? असा प्रश्न विचारला होता. त्याबाबत शिक्षकांनी दिलेला प्रतिसाद पुढील कोष्टक क्रमांक ५.२९ मध्ये दाखविलेला आहे.

**कोष्टक क्रमांक - ५.२९**

**चाचणी तपासून त्यांच्या नोंदीबाबत**

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय. | ५० | १००% |
| २. | नाही. | ०० | ००.००% |

कोष्टक क्रमांक - ५.२९ वरून असे दिसून येते की, ' चाचणी तपासून त्यांच्या नोंदी ठेवता का ? या समस्येला १००% शिक्षकांनी होकार दर्शविला.

सर्व शिक्षक चाचणी तपासून नोंदी ठेवतात. ही बाब समाधानकारक वाटते.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक ३१ मध्ये चाचणी तपासून त्यांच्या नोंदी ठेवताना आपणास कोणत्या समस्या आढळून येतात ? असा प्रश्न विचारला होता. त्याबाबत शिक्षकांनी दिलेला प्रतिसाद पुढील कोष्टक क्रमांक - ५.३० मध्ये दाखविलेला आहे.

## कोष्टक क्रमांक - ५.३०

## प्रत्याभरण नोंदीतील समस्या

| अ. नं. | समस्या | प्रतिसादक शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | प्रत्याभरण नोंद करण्यासाठी पुनूरअध्यापन पुन्हा अध्ययन ही वेळे अभावी शिक्षकाला अत्यंत कठीण काम आहे. | ४९ | ९८.००% |
| २. | प्रत्याभरण करण्यासाठी शिक्षकांस स्वतंत्र नोंदवही ठेवावी लागते. हे काम आधीच्या कामात खूप भर टाकते. | ५० | १००% |
| ३. | प्रत्याभरण नोंदीत शिक्षकांना पुन्हा विद्यार्थी प्रतिसाद नोंद करावी लागते ही विद्यार्थांशिवाय न होणारी बाब आहे. हा जादा वेळ कोठून उपलब्ध करावयाचा हा प्रश्न शिक्षकास भेडसावतो. | ३३ | ६६.००% |
| ४. | एकंदरीत प्रत्याभरण नोंदीच्या सक्तीमुळे शिक्षकाच्या कामाचा ताण निश्चितपणे वाढतो. | ४६ | ९२.००% |

वरील कोष्टक क्रमांक - ५.३० वरून असे दिसून येते की, ' प्रत्याभरण नोंद करण्यासाठी पुनूरअध्यापन पुन्हा अध्ययन ही वेळे अभावी शिक्षकाला अत्यंत कठीण काम आहे. ' या समस्येला ९८.००% शिक्षकांनी प्रतिसाद दिला.

' प्रत्याभरण करण्यासाठी शिक्षकांस स्वतंत्र नोंदवही ठेवावी लागते. हे काम आधीच्या कामात खूप भर टाकते. ' व ' एकंदरीत प्रत्याभरण नोंदीच्या सक्तीमुळे शिक्षकाच्या कामाचा ताण निश्चितपणे वाढतो.' या दोन्ही समस्येला फलटण तालुक्यातील३ री व ४ थी शिकवणाऱ्या शिक्षकांनी अनुक्रमे १००% व ९२.००% प्रतिसाद दिला.

परंतू ' प्रत्याभरण नोंदीत शिक्षकांना पुन्हा विद्यार्थी प्रतिसाद नोंद करावी लागते ही विद्यार्थ्यांशिवाय न होणारी बाब आहे. हा जादा वेळ कोठून उपलब्ध करावयाचा हा प्रश्न शिक्षकास भेडसावतो. ' ही समस्या ६६.००% शिक्षकांनी स्विकारली.

सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन झाल्यानंतर तसेच क्षमता चाचणी तपासल्यानंतर ज्या क्षमता विद्यार्थ्यांला अप्राप्त झाल्या असतील त्या क्षमता पुन्हा प्राप्त व्हाव्यात असे शिक्षकांनी क्षमताधिष्ठित अभ्यासक्रमात पहावे. त्यामुळे अप्राप्त क्षमताच्या अध्यापन, अध्ययन अनुभवासाठी शिक्षकांनी पुन्हा तयारी करावी. त्याचे प्रत्याभरण शिक्षकांनी करावे. असे संशोधकास वाटते.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक ३२ मध्ये सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन करताना मूल्यमापनाची साधने व तंत्रे प्रभावी वापरता का ? असा प्रश्न विचारला होता. त्याबाबत शिक्षकांचा प्रतिसाद पुढील कोष्टक क्रमांक - ५.३१ मध्ये दाखविलेला आहे.

**कोष्टक क्रमांक - ५.३१**

**मूल्यमापनाची साधने व तंत्राचा प्रभावी वापर**

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय. | ५० | १००% |
| २. | नाही. | ०० | ०% |

कोष्टक क्रमांक - ५.३१ वरून असे दिसून येते की, मूल्यमापन करताना शिक्षक प्रभावीपणे मूल्यमापनाची साधने व तंत्रे वापरतो का ? या समस्येला १००% शिक्षकांनी प्रतिसाद स्विकारला.

यावरून संशोधकास असे वाटते की, सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन करताना मूल्यमापनांची साधने व तंत्रे वापरताना ती प्रभावीपणे वापरुन विद्याथ्यांचे मूल्यमापन हे जास्तीत जास्त निर्दोष व सात्यपूर्ण सर्वंकष कसे होईल ते पहावे.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक ३३ मध्ये आपणास मूल्यमापन साधने व तंत्रे वापरताना कोणती साधने प्रभावी वाटतात असा प्रश्न विचारला होता. त्याबाबत शिक्षकांनी दिलेला प्रतिसाद पुढील कोष्टक क्रमांक - ५ ३२ मध्ये दाखविलेला आहे.

**कोष्टक क्रमांक - ५ ३२**

**प्रभावी मूल्यमापन साधने व तंत्रे**

| अ. नं. | साधने व तंत्रे | प्रतिसादक शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | **परीक्षा तंत्र** | | |
| | १. लेखी | ५० | १००% |
| | २.तोंडी | ५० | १००% |
| | ३.प्रात्यक्षिक | ५० | १००% |
| २. | **आत्मनिरीक्षण तंत्र** | | |
| | १. समस्यासूची | ४० | ८०.००% |
| | २. मुलाखती | ४२ | ८४.००% |
| ३. | **निरीक्षण तंत्र** | | |
| | १. पडताळा सूची | ४४ | ८८.००% |
| | २. पदनिश्चयन श्रेणी | ३५ | ७०.००% |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | अविष्कार तंत्र<br>१. वाक्यपूर्ती<br>२. गोष्ट पूर्ण करणे<br>३. चित्रे काढणे | <br>३०<br>२०<br>४० | <br>६०.००%<br>४०.००%<br>८०.००% |
| ५. | समाजमिती तंत्र<br>१. सामाजिक आलेख<br>२. ओळखा पाहू ! | <br>२५<br>५० | <br>५०.००%<br>१००% |

वरील कोष्टक क्रमांक - ५.३२ वरुन असे दिसून येते की, ' परीक्षा तंत्रामध्ये लेखी, तोंडी, प्रात्यक्षिक ' शिक्षकांनी वापरावयाबाबत १००% प्रतिसाद दिला असून ' आत्मनिरीक्षण तंत्र' यामध्ये ' समस्यासूची ' व ' मुलाखती ' यासाठी अनुक्रमे ८०.००% व ८४.००% प्रतिसाद शिक्षकांनी दिला.

'निराक्षण तंत्र' यात शिक्षकांकडून पडताळसूची, पदनिश्चयन श्रेणी यास ८८.००% व ७०.००% प्रतिसाद मिळाला.

' समाजमिती तंत्र ' यात शिक्षकांकडून मिळालेला प्रतिसाद ' ओळखा पाहू ' १००% मिळाला. सामाजिक आलेखास ५०.००% प्रतिसाद दिला.

यावरुन अध्यापन करताना शिक्षकांनी सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन करताना जास्तीत जास्त साधने व तंत्रे वापरुन मूल्यमापन प्रभावीपणे घडून येते का याकडे पहावे असे संशोधकास वाटते.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक ३४ मध्ये मूल्यमापन साधने व तंत्रे वापरताना अडचणी येतात ? असा प्रश्न विचारला होता. त्याबाबत शिक्षकांनी दिलेला प्रतिसाद पुढील कोष्टक क्रमांक - ५.३३ मध्ये दाखविलेला आहे.

**कोष्टक क्रमांक - ५.३३**

**मूल्यमापन साधने व तंत्रे वापरताना येणाऱ्या समस्या**

| अ. नं. | अडचणीचे स्वरुप | प्रतिसादक शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | साधनांची माहिती नाही. | ५० | १००% |
| २. | मूल्यमापनाची साधने व तंत्रे वापरताना खूप वेळ लागतो. | ३७ | ७४.००% |
| ३. | मूल्यमापन तंत्रे व साधने शिक्षकांस वापरताना कंटाळा येतो. | ०३ | ०६.००% |
| ४. | ही साधने क्लिष्ट आहेत. | १० | २०.००% |

वरील कोष्टक क्रमांक - ५.३३ वरुन असे दिसून येते की, 'साधनांची माहिती नसणे' या समस्येला १००% शिक्षकांनी प्रतिसाद दिला. 'मूल्यमापनाची साधने व तंत्रे वापरताना खूप वेळ लागतो' या समस्येला ७४.००% प्रतिसाद शिक्षकांनी दिला. 'ही साधने क्लिष्ट आहेत' या समस्येला २०.००% प्रतिसाद दिला.

'मूल्यमापन तंत्रे व साधने वापरताना कंटाळा येतो' या समस्येला ०६.००% शिक्षकांनी प्रतिसाद दिला.

शिक्षकांनी साधनांची माहिती घेऊन, साधने व तंत्रे वापरण्याचे कौशल्य विकसित करून घेऊन, शिक्षकांना शिबिरातून चर्चेद्वारे अशा साधनांचा वापर व त्यांचा उपयोग आपल्या मूल्यमापनात करण्यासाठी शिक्षकांनी जाणीवपूर्वक प्रयत्न करावा, असे संशोधकास वाटते.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक ३५ मध्ये अप्रगत मुलांच्या बाबतीतील समस्या कशा सोडवता ? असा प्रश्न विचारला होता. त्याबाबत शिक्षकांनी दिलेला प्रतिसाद पुढील कोष्टक क्रमांक - ५.३४ मध्ये दाखविलेला आहे.

**कोष्टक क्रमांक - ५.३४**

**अप्रगत मुलांसंबंधी समस्या**

| अ. नं. | समस्या | प्रतिसादक शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | मतिमंद मुलांची आकलन शक्ती अत्यंत कमी असते. अशा मुलांसाठी क्षमताधिष्ठित मूल्यमापनात विशेष सवलत नाही. | ३९ | ७८.००% |
| २. | मतिमंद मुलांचा प्रतिसाद मिळत नाही. | ३९ | ७८.००% |
| ३. | अप्रगत मुलांसाठी शिक्षकाला पुनर्अध्यापन, पुनर्अध्यापन अनुभव यासाठी वेळ अपूर्ण मिळतो. | ५० | १००% |

कोष्टक क्रमांक - ५.३४ वरुन असे दिसून येते की, 'अप्रगत मुलांसाठी शिक्षकाला पुनर्अध्यापन, पुनरअध्यापन अनुभव यासाठी वेळ अपूर्ण मिळतो.' ही समस्या फलटण तालुक्यातील सर्वच्या सर्व म्हणजे १००% शिक्षकांना आली, त्यामुळे ही समस्या निश्चितच महत्त्वाची आहे. तसेच 'मतिमंद मुलांचा प्रतिसाद मिळत नाही.' आणि 'मतिमंद मुलांची आकलन शक्ती अत्यंत कमी असते.' अशा 'मुलांसाठी क्षमताधिष्ठित मूल्यमापनात विशेष सवलत नाही.' या दोन्ही समस्यांना ७८.००% शिक्षकांनी प्रतिसाद दिला.

क्षमताधिष्ठित अभ्यासक्रमात प्राथमिक शिक्षकांना अप्रगत मुलांच्या बाबतीत अध्यापनापासून ते मूल्यमापनापर्यंत समस्या येत असतात. सर्व अप्रगत मुलांच्या सर्व क्षमता प्राप्त होईपर्यंत शिक्षकांनी खूप

प्रयत्न करुन त्यांच्या प्रत्याभरण नोंदी करुन त्यांच्या ज्ञानात भर घालून त्यांचा विकास साधण्याचा प्रयत्न करुन पहावा.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक ३६ मध्ये अध्यापनाव्यतिरिक्त कामामुळे क्षमताधिष्ठित मूल्यमापनात काही समस्या येतात का ? असा प्रश्न विचारला होता त्याबाबत शिक्षकांनी दिलेला प्रतिसाद पुढील कोष्टक क्रमांक - ५.३५ मध्ये दाखविलेला आहे.

**कोष्टक क्रमांक - ५.३५**

**अध्यापनाव्यतिरिक्त कामामुळे क्षमताधिष्ठित मूल्यमापनात येणाऱ्या समस्यांचा प्रतिसाद**

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय. | ५० | १००% |
| २. | नाही. | ०० | ०% |

कोष्टक क्रमांक - ५.३५ वरुन असे दिसून येते की, अध्यापनाव्यतिरिक्त कामामुळे क्षमताधिष्ठित अभ्यासक्रमाच्या मूल्यमापनात प्राथमिक शिक्षकांना समस्या जाणवतात. त्यांनी दिलेला प्रतिसाद १००% असून शासनाने शिक्षकांना अध्यापना व्यतिरिक्त शिक्षकांवरील कामाचा भार कमी करावा व त्यांना अध्यापनास जास्त वेळ कसा देता येईल हे पहावे.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक ३७ मध्ये अध्यापनाव्यतिरिक्त कामामुळे क्षमताधिष्ठित मूल्यमापनात समस्या येतात ? अशा स्वरुपाचा प्रश्न विचारला होता. त्यास शिक्षकांनी दिलेला प्रतिसाद पुढील कोष्टक क्रमांक - ५.३६ मध्ये दाखविलेला आहे.

**कोष्टक क्रमांक - ५.३६**

**अध्यापन व्यतिरिक्त कामामुळे येणाऱ्या समस्या**

| अ. नं. | समस्या | प्रतिसादक शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | प्राथमिक शिक्षकांना अनेक अध्यापन बाह्य कामांचा मूल्यमापनावर परिणाम होतो. ( उदा. ग्रामअभियान, साक्षरता अभियान, जनगणना, अल्पबचत, कुटुंबकल्याण इ. ) | ५० | १००% |
| २. | प्राथमिक शाळेत एका वर्गाला एकच शिक्षक असतो.तो परीक्षा कालावधीत प्रशासकीय कामास( उदा. मिटींग, पगार आणणे इ. ) गेल्यास त्या दिवसाचे मूल्यमापन अचूक होत नाही. | ४८ | ९६.००% |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | क्षमताधिष्ठित मूल्यमापन काळात कधी-कधी तांदूळ वाटपासारखे तातडीचे काम करावे लागते, त्यामुळे मूल्यमापन सदोष होते. | ४३ | ८६.००% |
| ४. | शिक्षकांस शाळेत स्वयंसेवक म्हणून काम करावे लागते.त्यामुळे त्याच्यावर अध्यापन बाह्य कामाचा बोजाही सहन करावा लागतो, त्यामुळे मूल्यमापन निर्दोष होत नाही. | ४७ | ९४.००% |

कोष्टक क्रमांक - ५.३६ वरुन असे दिसून येते की, ‘ प्राथमिक शिक्षकांना अनेक अध्यापन बाह्य कामांचा मूल्यमापनावर परिणाम होतो.’ ही समस्या १००% शिक्षकांनी स्वीकारली. तर ‘ प्राथमिक शाळेत एका वर्गाला एकच शिक्षक असतो. तो परीक्षा कालावधीत प्रशासकीय कामास गेल्यास त्या दिवशीचे मूल्यमापन अचूक होत नाही.’ या समस्येला ९६.००% शिक्षकांनी प्रतिसाद दिला.

‘ प्राथमिक शाळेत शिक्षकाला स्वयंसेवक म्हणून काम करावे लागते. त्यामुळे त्याच्यावर अध्यापन बाह्य कामाचा बोजा ही सहन करावा लागतो. त्यामुळे मूल्यमापन निर्दोष होत नाही.’ ही समस्या फलटण तालुक्यातील ९४.००% शिक्षकांनी स्वीकारली.

‘ क्षमताधिष्ठित मूल्यमापन काळात कधी - कधी तांदूळ वाटपासारखे तातडीचे काम करावे लागते. त्यामुळे मूल्यमापन सदोष बनते.’ ही समस्या फलटण तालुक्यातील ८६.००% शिक्षकांनी स्वीकारली.

प्राथमिक शिक्षक अति ग्रामीण जावून काम करणारा शासकयि कर्मचारी आहे. तो वाडी, वस्तीतून अध्यापनाचे कार्य करतो. क्षमताधिष्ठित अभ्याक्रमास सुनियोजित अभ्यासक्रम राबवितो. काही शाळांवर तर एकच प्राथमिक शिक्षक काम करीत असतो. त्यावर असा अध्यापनबाह्य कामांचा बोजा लादला जातो.

शिक्षकांनी अध्यापन बाह्य कामांचा बोजा शासनाकडे सतत पाठपुरावा करुन या बाह्य कामाचा बोजा कमी करुन घेवून आपला जास्तीत जास्त वेळ अध्यापनास देवून आपले अध्यापन प्रभावीपणे करावे असे संशोधकास वाटते.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक ३८ मध्ये क्षमता चाचणी उत्तरपत्रिका नसल्यामुळे पेपर तपासणी करताना कोणकोणत्या अडचणी येतात ? असा प्रश्न विचारला होता. त्याबाबत शिक्षकांनी दिलेला प्रतिसाद पुढील कोष्टक क्रमांक - ५.३७ मध्ये दाखविलेला आहे.

**कोष्टक क्रमांक - ५.३७**

**क्षमता चाचणी उत्तरपत्रिका नसल्यामुळे पेपर तपासणीतील समस्या**

| अ. नं. | समस्या | प्रतिसादक शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | योग्य दिशा मिळत नाही. | ४९ | ९८.००% |
| २. | गुणदान योग्य करता येत नाही. | ४२ | ८४.००% |
| ३. | इतर | ०० | ०% |

कोष्टक क्रमांक ५.३७ वरुन असे दिसून येते की, ‘ योग्य दिशा मिळत नाही ’ या समस्येला ९८.००% शिक्षकांनी प्रतिसाद दिला. तर ‘ क्षमता चाचणी उत्तरपत्रिका नसल्यामुळे पेपर तपासताना, ‘ गुणदान योग्य करता येत नाही, ’ ही समस्या ८४.००% शिक्षकांना जाणवली. त्यामुळे संशोधकास असे वाटते की, क्षमता चाचणी उत्तरपत्रिका ही सामान्य प्रश्नपत्रिकेबरोबरच दिली जावी. त्यामुळे शिक्षकांच्या या समस्या सोडवणूकीस मदत होईल.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक ३९ मध्ये ‘ प्रगतीपुस्तके भरताना आपणास अडचणी येतात का ? असा प्रश्न विचारला होता. त्याबाबत शिक्षकांनी दिलेला प्रतिसाद पुढील कोष्टक क्रमांक - ५.३८ मध्ये दाखविलेला आहे.

**कोष्टक क्रमांक - ५.३८**

**प्रगतीपुस्तके भरताना येणाऱ्या समस्येबाबत शिक्षकांचे मत**

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय. | ४७ | ९४.००% |
| २. | नाही. | ०३ | ०६.००% |

कोष्टक क्रमांक - ५.३८ वरुन असे दिसून येते की, प्रगतीपुस्तके भरताना येणाऱ्या समस्येला ९४.००% शिक्षकांनी प्रतिसाद दर्शविलेला आहे.

त्यामुळे प्रगतीपुस्तके भरताना शिक्षकांचे उद्‌बोधन वर्ग शासनाने घ्यावेत व त्यातील त्रुटी दूर कराव्यात असे संशोधकास वाटते.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक ४० मध्ये प्रगतीपुस्तके भरताना कोणत्या अडचणी येतात ? असा प्रश्न विचारला होता. त्याबाबत शिक्षकांनी दिलेला प्रतिसाद पुढील कोष्टक क्रमांक - ५.३९ मध्ये दाखविलेला आहे.

## कोष्टक क्रमांक ५.३९

## प्रगती पुस्तकातील नोंदणी बाबतच्या समस्या

| अ. नं. | समस्या | प्रतिसादक शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | चाचणीतील शाब्दीक वर्णन व श्रेणी यांचे अर्थ व मापन समान असते. त्यासाठी वेगवेगळ्या रकान्यांची आवश्यकता नाही. | ४६ | ९२.००% |
| २. | प्रगतीदर्शक शाब्दीक नोंदी करताना जागा अतिशय अपूर्ण असते. | ४९ | ९८.००% |
| ३. | प्रत्येक चाचणीच्या त्रुटींची नोंद करताना जागा अपूर्ण असते. | ४९ | ९८.००% |
| ४. | त्रुटींची नोंद व त्रुटींची पूर्तता एकाच रकान्यातअसतात, दोन्ही नोंदी इतक्या छोट्या रकान्यात होत नाहीत. | ४९ | ९८.००% |
| ५. | प्रगतीदर्शक नोंद किंवा त्रुटीची नोंद इतक्या छोट्या रकान्यात एक किंवा दोन शब्दांतच होते. त्यावरुन त्याचा निश्चित अर्थबोध होत नाही. | ४८ | ९६.००% |
| ६. | प्रगतीपुस्तकात शिक्षकांचे प्रत्याभरण केलेल्या गुणांची नोंद कोठेही नसते. | ४८ | ९६.००% |
| ७. | विद्यार्थी, वर्तणूक, गणवेश, स्वच्छता, टापटीप शा. शिक्षण, कला, कार्या इ. विषयांची निरीक्षणे नोंद म्हणजे पुन्हा त्यासाठी वेळ व नोंद यासाठी कालावधीचा विचार होत नाही. | ४१ | ८२.००% |

कोष्टक क्रमांक - ५.३९ वरुन असे दिसून येते की, ' प्रगतीदर्शक शाब्दीक नोंदी करताना जागा अतिशय अपूर्ण असते.' व ' प्रत्येक चाचणीच्या त्रुटींची नोंद करताना जागा अपूर्ण असते. ' आणि ' त्रुटींची नोंद व त्रुटींची पूर्तता ,काच रकान्यात असतात, दोन्ही नोंदी इतक्या छोट्या रकान्यात होत नाहीत. 'या तिन्ही समस्यांना ९८.००% शिक्षकांनी प्रतिसाद दिला. तर ' प्रगतीदर्शक नोंद किंवा त्रुटीची नोंद इतक्या छोट्या रकान्यात एक किंवा दोन शब्दांतच होते. त्यावरुन त्याचा निश्चित अर्थबोध होत नाही. ' व ' प्रगतीपुस्तकात शिक्षकांचे प्रत्याभरण केलेल्या गुणांची नोंद कोठेही नसते.' या दोन्ही समस्या ९६.००% शिक्षकांना आल्या.

विद्यार्थी, वर्तणूक , गणवेश, स्वच्छता, टापटीप, शा. शिक्षण, कला, कार्या. इ. विषयांची निरीक्षण नोंद म्हणजे पुन्हा त्यासाठी वेळ व नोंद यासाठी कालावधीचा विचार होत नाही. समस्या ८२.००% शिक्षकांना आली.

विद्यार्थ्याला व पालकांना आपण अथवा आपल्या पाल्याने परीक्षेत केलेल्या प्रगतीची माहिती प्रगतीपुस्तकातून मिळते. क्षमताधिष्ठित अभ्यासक्रमाच्या मूल्यमापनात त्याला अत्यंत अनन्य साधारण महत्त्व आहे. त्यावरुन पालकाला आपल्या पाल्यांची प्रगती अथवा अधोगती समजते. त्यांच्या नोंदी शिक्षकांनी काळजीपूर्वक कराव्यात असे संशोधकास वाटते.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक ४१ मध्ये गेल्या वर्षी निकालपत्र तयार करताना आपणास काही अडचणी आल्या का ? असा प्रश्न विचारला होता. त्याबाबत शिक्षकांनी दिलेला प्रतिसाद पुढील कोष्टक क्रमांक -५.४० मध्ये दाखविलेला आहे.

**कोष्टक क्रमांक - ५.४०**

**निकालपत्रक भरताना आलेल्या अडचणी बाबत**

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय. | ४३ | ८६.००% |
| २. | नाही. | ०७ | १४.००% |

कोष्टक क्रमांक - ५.४० वरुन असे दिसून येते की, गेल्या वर्षी निकाल पत्रक भरताना ८६.००% शिक्षकांना समस्या जाणवल्या. व १४.००% शिक्षकांना समस्या जाणवली नाही.

प्रगतीपुस्तकांबाबत उद्बोधन वर्ग जसा घ्यावा त्याच पध्दतीने केंद्र पातळीवर केंद्रप्रमुखांनी निकाल तयार करण्याबाबत शिक्षकांचे उद्बोधन वर्ग घ्यावेत असे संशोधकास वाटते.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक ४२ मध्ये गेल्या वर्षी निकाल पत्रक तयार करताना कोणत्या अडचणी आल्या ? असा प्रश्न विचारला होता. त्याबाबत शिक्षकांनी दिलेला प्रतिसाद पुढील कोष्टक क्रमांक- ५.४१ मध्ये दाखविलेला आहे.

**कोष्टक क्रमांक - ५.४१**

**निकालपत्रक तयार करताना आलेल्या समस्या**

| अ. नं. | समस्या | प्रतिसादक शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | निकालपत्रकात गुणात्मक नोंद नसते. त्यामुळे सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन होत नाही. | ४४ | ८८.००% |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | मूल्यमापन = गुणात्मक मापन + संख्यात्मक मापन + शिक्षकांचा अभिप्राय असे असूनही केवळ संख्यात्मक मूल्यमापनाचाच निकाल पत्रकात समावेश होतो. | ४९ | ९८.००% |
| ३. | गुणात्मक मापन व शिक्षकांच्या अभिप्रायाला निश्चित संख्यात्मक अर्थ नाही. त्यामुळे एकत्र मूल्यमापन होत नाही. | ४९ | ९८.००% |
| ४. | क्षमताधिष्ठित मूल्यमापनात एखादा विद्यार्थी गैरहजर राहिल्यास त्यासाठी विशेष मूल्यमापन तंत्र नाही. | १७ | ३४.००% |

कोष्टक क्रमांक - ५.४१ वरुन असे दिसून येते की, ' मूल्यमापन = गुणात्मक मापन + संख्यात्मक मापन + शिक्षकांचा अभिप्राय असे असून ही केवळ संख्यात्मक मूल्यमापनाचाच निकालपत्रकात समावेश होतो ' व ' गुणात्मक मापन व शिक्षकांचा अभिप्राय याला निश्चित संख्यात्मक अर्थ नाही. त्यामुळे एकत्र मूल्यमापन होत नाही.' या दोन्ही समस्यांना फलटण तालुक्यातील इ. ३ री / ४ थी ला शिकविणाऱ्या ९८.००% शिक्षकांनी प्रतिसाद दिला.

' निकालपत्रकात गुणात्मक नोंद नसते. त्यामुळे सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन होत नाही. ' ही समस्या ८८.००% शिक्षकांनी स्वीकारली. मात्र ' क्षमताधिष्ठित मूलयमापनात एखादा विद्यार्थी गैरहजर राहिल्यास त्यासाठी विशेष मूल्यमापन तंत्र नाही.' ही समस्या अक्षरश: ६६.००% शिक्षकांनी साफ नाकारली.

अभ्यासक्रम कोणता ही असो त्याचे मूल्यमापन झाल्याशिवाय राहत नाही. शिक्षण प्रक्रियेत मूल्यमापन हा अविभाज्य घटक आहे. मूल्यमापन प्रक्रिया पूर्ण झाली. संपूर्ण वर्षातील विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे चित्र स्पष्ट करावे लागते. ते चित्र प्रशासकीय कामकाजासाठीही संकलित करावे लागते. हे शिक्षकांनी काळजीपूर्वक करावे. असे संशोधकास वाटते.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक ४३ मध्ये निदानात्मक, उपचारात्मक अध्यापन आपण करता काय ? असा प्रश्न विचारला होता. त्याबाबत शिक्षकांनी दिलेला प्रतिसाद पुढील कोष्टक क्रमांक - ५.४२ मध्ये दाखविलेला आहे.


**कोष्टक क्रमांक - ५.४२**

**निदानात्मक, उपचारात्मक कार्यक्रम राबविण्याबाबत शिक्षकांचे मत**

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय. | ०६ | १२.००% |
| २. | नाही. | ४४ | ८८.००% |

आलेख क्रमांक - ५.०६

उपचारात्मक अध्यापनाच्या समस्याबाबतचा प्रतिसाद



कोष्टक क्रमांक - ५.४२ वरुन असे दिसून येते की, निदानात्मक, उपचारात्मक अध्यापन आपण करता काय ? या समस्येला १२.००% शिक्षकांनी प्रतिसाद दिला. व ८८.००% शिक्षकांनी यास नकारार्थी प्रतिसाद दिला.

परंतु सर्व शिक्षकांनी निदानात्मक, उपचारात्मक अध्यापन कार्यक्रम राबवावेत असे संशोधकास वाटते.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक ४४ मध्ये निदानात्मक, उपचारात्मक अध्यापनात समस्या येतात का ? असा प्रश्न विचारला होता. त्याबाबत शिक्षकांचा प्रतिसाद पुढील कोष्टक क्रमांक - ५.४३ मध्ये दाखविलेला आहे.

**कोष्टक क्रमांक - ५.४३**

**उपचारात्मक अध्यापनाच्या समस्या बाबतचा प्रतिसाद**

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय. | ४३ | ८६.००% |
| २. | नाही. | ३७ | १४.००% |

कोष्टक क्रमांक - ५.४३ वरुन असे दिसून येते की, उपचारात्मक अध्यापनाबाबत शिक्षकांना समस्या येते. ही समस्या ८६.००% शिक्षकांनी स्वीकारली.

शिक्षकांनी अध्यापन झाल्यावर विद्यार्थ्यांच्या प्रगतीबाबत निदान करावे. व त्यास अनुसरुनच उपचारात्मक अध्यापन करुन त्यांच्या नोंदी कराव्यात.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक ४५ मध्ये उपचारात्मक अध्यापानबाबत कोणत्या समस्या येतात ? असा प्रश्न विचारला होता त्याबाबत शिक्षकांनी दिलेला प्रतिसाद पुढील कोष्टक क्रमांक - ५.४४ मध्ये दाखविलेला आहे.

**कोष्टक क्रमांक - ५.४४**

**उपचारात्मक अध्यापनाबाबतच्या समस्या**

| अ. नं. | समस्या | प्रतिसादक शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | अपुरा वेळ | ५० | १००% |
| २. | विद्यार्थी संख्या जास्त | ०० | ०% |
| ३. | इतर | ०० | ०% |

कोष्टक क्रमांक - ५.४४ मध्ये असे दिसून येते की, उपचारात्मक अध्यापन करताना ' अपुरा वेळ ' ही समस्या १००% शिक्षकांनी स्वीकारली असून यावरुन संशोधकास असे वाटते की, अध्यापानस उपचारात्मक अध्यापनास महत्त्व देवून त्यानुसार शिक्षकांनी उपचारात्मक अध्यापन करावे. तसेच जादा तास घ्यावेत. अध्यापनात संदभ्र ग्रंथांचा वापर करून , विद्यार्थांला क्षमता प्राप्त होते. वेळ अपुरा पडतो. हे कारण योग्य वाटत नाही.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक ४६ मध्ये शिक्षकांच्या मानसिकतेवर क्षमताधिष्ठित मूल्यमापनाचा काही परिणाम होतो का ? असा प्रश्न विचारला होता. त्याबाबत शिक्षकांनी दिलेला प्रतिसाद पुढील कोष्टक क्रमांक - ५.४५ मध्ये दाखविलेला आहे.

**कोष्टक क्रमांक - ५ .४५**

**क्षमताधिष्ठित मूल्यमापनाचा शिक्षकांच्या मानसिकतेबाबत शिक्षकांचा प्रतिसाद**

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय. | २४ | १००% |
| २. | नाही. | ०० | ०% |

कोष्टक क्रमांक - ५.४५ वरुन असे दिसून येते की, शिक्षकांच्या मानसिकतेवर क्षमताधिष्ठित मूल्यमापनाचा परिणाम होतो का ? समस्येला १०० % शिक्षकांनी होकारात्मक प्रतिसाद दिला. शिक्षकांनी मानसिक स्वास्थ्य चांगले ठेवून क्षमताधिष्ठित मूल्यमापन करावे असे संशोधकास वाटते.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक ४७ मध्ये शिक्षकांच्या मानसिकतेवर क्षमताधिष्ठित मूल्यमापनाचा परिणाम होत असल्यास कोणता होतो ? असा प्रश्न विचारला होता. त्याबाबत शिक्षकांनी दिलेला प्रतिसाद पुढील कोष्टक क्रमांक - ५.४६ मध्ये दाखविलेला आहे.

**कोष्टक क्रमांक - ५.४६**

**क्षमताधिष्ठित मूल्यमापनाचा शिक्षकांच्या मानसिकतेवर होणारा परिणाम.**

| अ. नं. | समस्या | प्रतिसादक शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | क्षमताधिष्ठित अभ्यासक्रमाच्या मूल्यमापनामुळे शिक्षकाला मानसिक ताण जाणवतो. | ४९ | ९८.००% |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | शिक्षकाला व्यक्तीगत, खाजगी जीवनाकडे लक्ष देण्यास अत्यंत अल्प वेळ मिळतो. याचा परिणाम शिक्षकांच्या कामकाजावर होतो. | ४७ | ९४.००% |
| ३. | शिक्षकाला यामुळे थकवा येतो. त्यामुळे त्याचे कामात लक्ष लागत नाही. | ४३ | ८६.००% |
| ४. | अधिकारी वर्ग शिक्षकांच्या कौटुंबिक जीवनाचा मानसिकतेचा कधीही विचार करत नाही. त्यामुळे त्याचा परिणाम शिक्षकांवर होतो. | ४७ | ९४.००% |

कोष्टक क्रमांक - ५.४६ वरुन असे दिसून येते की, ' क्षमताधिष्ठित मूल्यमापनामुळे शिक्षकाला जास्तीत जास्त मानसिक ताण जाणवतो. ' या समस्येला ९८.००% शिक्षकांनी प्रतिसाद दिला. तर ' शिक्षकाला व्यक्तिगत खाजगी जीवनाकडे लक्ष देण्यास अत्यंत अल्प वेळ मिळतो. याचा परिणाम शिक्षकांच्या कामकाजावर होतो. व अधिकारी वर्ग शिक्षकांच्या कौटुंबिक जीवनाचा, मानसिकतेचा कधीही विचार करत नाहीत. त्यामुळे त्याचा परिणाम शिक्षकांवर होतो. ' या दोन्ही समस्येला ९४.००% शिक्षकांनी प्रतिसाद दिला.

' शिक्षकाला यामुळे थकवा येतो. त्यामुळे त्याचे कामात लक्ष लागत नाही. ' ही समस्या फक्त ८६.००% शिक्षकांनीच मान्य केली.

क्षमताधिष्ठित अभ्यासक्रमाच्या मूल्यमापनात अनेक प्रकारच्या नोंदी करावयाच्या असतात. या नोंदी शिक्षकाला अध्यापन कामकाजाव्यतिरिक्त कराव्या लागतात. त्यामुळे थकवा येतो. त्याला नोंदीच्या पूर्ततेकडे लक्ष देवून कामात बदल करुन थकवा व कंटाळा घालवावा. म्हणजे त्याचा मानसिक ताण कमी होईल. व मानसिक ताण जाणवणार नाही. असे संशोधकास वाटते.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक ४८ मध्ये क्षमताधिष्ठित अभ्यासक्रमात कोणते काम तुम्हास जास्त क्लिष्ट वाटते ? असा प्रश्न विचारला होता. त्यास शिक्षकांनी दिलेला प्रतिसाद पुढील कोष्टक क्रमांक - ५.४७ मध्ये दाखविलेला आहे.

## कोष्टक क्रमांक ५.४७

## क्षमताधिष्ठित अभ्यासक्रमातील क्लिष्ट कामाबाबत

| अ. नं. | क्लिष्ट कामाचे स्वरुप | प्रतिसादक शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | क्षमताधिष्ठित अध्यापन | ०२ | ०४.००% |
| २. | क्षमताधिष्ठित मूल्यमापन नोंदी | ४८ | ९६.००% |
| ३. | उपचारात्मक अध्यापन | ३० | ६०.००% |
| ४. | इतर | ०० | ०% |

कोष्टक क्रमांक - ५.४७ वरुन असे दिसून येते की, ' क्षमताधिष्ठित मूल्यमापन नोंदी ' या समस्येला ९६.००% शिक्षकांनी प्रतिसाद तर ' क्षमताधिष्ठित अध्यापन हे काम क्लिष्ट नाही ' यास ९६.००% शिक्षकांनी समस्या नाकारली.

यावरुन संशोधकास असे वाटते की, क्षमताधिष्ठित मूल्यमापन नोंदी ह्या वर्गात अध्यापन चालू असताना अधिकाऱ्यास तपासणे शक्य नाही. तसेच या नोंदी करताना अनेक समस्या येणार. पण त्या नोंदी शिक्षकांनी करणे गरजेचे आहे. त्यावर विद्यार्थ्यांचा संकलित विकासात्मक नोंदी अहवाल अवलंबून आहे.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक ५० मध्ये प्रशिक्षणाबाबत क्षमताधिष्ठित अभ्यासक्रमांचे सेवांतर्गत प्रशिक्षण घेतले आहे का ? असा प्रश्न विचारला होता. त्याबाबत शिक्षकांनी दिलेला प्रतिसाद पुढील कोष्टक क्रमांक - ५.४८ मध्ये दाखविलेला आहे.

**कोष्टक क्रमांक - ५.४८**

**क्षमताधिष्ठित सेवांतर्गत प्रशिक्षणाबाबत शिक्षकांचे मत**

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | क्षमताधिष्ठित सेवांतर्गत प्रशिक्षण घेतले आहे. कां ? | ५० | १००% |
| २. | किती दिवसाचे असावे ?२८ / ३० दिवस | ३१ | ६२.००% |
| ३. | साधने व तंत्रे यांचे प्रशिक्षणामध्ये प्रशिक्षण घेतले आहे का ? | ५० | १००% |

कोष्टक क्रमांक - ५.४८ वरुन असे दिसून येते की, १००% शिक्षकांनी ' क्षमताधिष्ठित सेवांतर्गत प्रशिक्षण घेतले आहे.' त्याची आवश्यकता आहे. एकाही शिक्षकास प्रशिक्षण नसावे असे वाटत नाही. प्रशिक्षण घेतल्याने शिक्षकांचे उद्‌बोधन होते व ज्ञानात भर पडते. त्यांचे ज्ञान अद्ययावत होते. त्यामुळे प्रशिक्षण असावे ही बाब योग्य वाटते.

' शिक्षकांनी प्रशिक्षण किती दिवसाचे असावे' या समस्येला ६२.००% शिक्षकांनी प्रतिसाद दर्शविला. व ३८.००% शिक्षकांनी ही समस्या नाकारली. कालावधी ही वाढवावा असे शिक्षकांनी सूचविले आहे. ही बाब समाधानकारक वाटते.

कालावधी २८ / ३० दिवसाचा असावा वाटतो. केवळ १४ किंवा १५ दिवसात शिक्षकांचे प्रशिक्षण पूर्ण होणार नाही. तर तो कालावधी शासनाने कमीत - कमी २८ दिवसांचा करावा असे संशोधकास वाटते.

प्रशिक्षणामुळे क्षमताधिष्ठित शिक्षणास योग्य दिशा व मूल्यमापन कसे करायचे ते समजणार आहे. क्षमताधिष्ठित शिक्षणाबाबत पूर्ण माहिती शिक्षकांना मिळणार आहे. हे ही फायदे प्रशिक्षणामुळे होणार आहेत.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक ५१ मध्ये विद्यार्थ्यांच्या क्षमता विकासाचे यथार्थ मोजमाप करण्यासाठी क्षमताधिष्ठित शिक्षक प्रशिक्षण कसे वाटते ? असा प्रश्न विचारला होता. त्याबाबत शिक्षकांनी दिलेला प्रतिसाद पुढील कोष्टक क्रमांक - ५.४९ मध्ये दाखविलेला आहे.

**कोष्टक क्रमांक - ५.४९**

**क्षमताधिष्ठित प्रशिक्षण कसे असावे याबाबत शिक्षकांचा प्रतिसाद**

| अ. नं. | प्रतिसादाचे स्वरुप | प्रतिसादक शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | सक्तीचे | ५० | १००% |
| २. | शिक्षकांची आवड विचारात घेवून | ३६ | ७२.००% |
| ३. | शासकीय धोरणाची कार्यपूर्ती करणारे | ०७ | १४.००% |
| ४. | इतर | ०० | ० % |

कोष्टक क्रमांक - ५.४९ वरुन असे दिसून येते की, क्षमताधिष्ठित शिक्षण कसे असावे या समस्येतून ' प्रशिक्षण सक्तीचे ' असावे असे १००% शिक्षकांनी प्रतिसाद दर्शविलेला आहे. तर ' शिक्षकांची आवड विचारात घेवून ' यास ७२.००% शिक्षकांनी प्रतिसाद दिला असून ' शासकीय धोरणाची कार्यपूर्ती करणारे ' या समस्येला ८६.००% प्रतिसाद नकारार्थी दिला आहे.

यावरुन संशोधकास असे वाटते की, प्रशिक्षण हे सर्व शिक्षकांना सक्तीचे द्यावे असे मत शिक्षकांनी व्यक्त केले आहे. पण प्रशिक्षण हे उद्बोधनास व कार्यपूर्ती करणारे असावे.

प्रश्नावलीत प्रश्न क्रमांक ५२ मध्ये क्षमताधिष्ठित प्रशिक्षणामध्ये मूल्यमापन संदर्भात आपणास कोणत्या उणीवा जाणवल्या ? असा प्रश्न विचारला होता. त्याबाबत शिक्षकांनी दिलेला प्रतिसाद पुढील कोष्टक क्रमांक - ५.५० मध्ये दाखविलेला आहे.

**कोष्टक क्रमांक - ५.५०**

**क्षमताधिष्ठित प्रशिक्षणामध्ये मूल्यमापना संबंधीच्या उणीवा**

| अ. नं. | उणीवा | प्रतिसादक शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | अपुरा कालावधी | ४३ | ८६.००% |
| २. | शैक्षणिक साधनांचा अभाव | ४० | ८०.००% |
| ३. | प्रशिक्षक शिक्षकांचा अभाव | ५० | १००% |
| ४. | इतर | ०० | ०% |

कोष्टक क्रमांक - ५.५० वरुन असे दिसून येते की, क्षमताधिष्ठित प्रशिक्षणामध्ये मूल्यमापनासंबंधी उणीवा मध्ये , ' प्रशिक्षक शिक्षकांचा अभाव ' १००% शिक्षकांनी प्रतिसाद दर्शविलेला आहे. ' अपुरा कालावधी ' याबाबत ८६.००% शिक्षकांनी प्रतिसाद दिला. ' शैक्षणिक साधनांचा अभाव ' या उणीवेस ८०.००% शिक्षकांनी प्रतिसाद दिला.

मूल्यमापनाबाबत क्षमताधिष्ठित अभ्यासक्रम मूल्यमापन या प्रक्रियेस अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. असे संशोधकास वाटते. त्यासाठी प्रशिक्षक शिक्षकांचा अभाव दूर करुन शासनाने शिक्षकांना प्रशिक्षण द्यावे.